सेवावर्धिनी
एक विश्वासार्ह सहकारी

# सेवा तरंग 2.0

# सेवा वार्ता

अंक ८
२०२५-२६

सेवावर्धिनी
नोंदणीकृत पत्ताः ३९० ब, नारायण पेठ, "दत्तधाम", राष्ट्रभाषा भवन लेन, पुणे-४११०३०
कार्यालयः "चंदन" २६, प्रशांत नगर, नवी पेठ, पुणे-४११०३०

# अनुक्रमणिका


१. मनोगत

२. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

२.१ समतोल फाऊंडेशन

२.२ बेघर मुलांना सावरणारी "जीवन संवर्धन फाऊंडेशन"

३. प्रकल्प व्यवस्थापन - शास्त्र आणि एक कला

४. सकस परसबाग प्रकल्प

५. सेवाव्रती

५.१ नारायणन कृष्णन : कुशल आचारी ते मानवसेवेचा प्रणेता

५.२ डॉक्टर अभिजित सोनावणे

६. सेवावार्ता :
स्वयंसेवी संस्थांचे आर्थिक व्यवस्थापन आणि निधी संकलनाचे महत्त्व

# १. मनोगत

नमस्कार मंडळी,

सेवातरंग दोन अंतर्गत आजचा हा आठवा आणि शेवटचा अंक. शेवटचा यासाठी की आपण सेवातरंग तीनचे नियोजन लवकरच जाहीर करत आहोत. आपले प्रतिसाद, आपल्या अपेक्षा लक्षात घेऊन सेवासंस्थांसाठी आवश्यक असलेली कार्यपद्धतीची विविध माहिती देण्याचा प्रयत्न आम्ही आतापर्यंत केला.

या अंकात नेहमीप्रमाणे दोन सेवाभावी संस्थांच्या कार्याबद्दलचे माहिती, दोन सेवाव्रती व त्यांचे कार्य याची माहिती, तसेच प्रकल्प व्यवस्थापन या महत्वाच्या विषयाबद्दल माहिती समाविष्ट केली आहे. समतोल फाउंडेशन या मुलांसाठी काम करणा-या संस्थेबद्दलच्या लेखामधे आपल्या दैनंदीन जीवनात दिसणा-या पण आपण दुर्लक्ष करत असलेल्या विषयाबद्दल आपल्याला जाणीव करुन देण्यात आली आहे व याबरोबरच आपल्या कडून अपेक्षित असे आपण काय करु शकतो याचा विचारही मांडण्यात आला आहे. बेघर मुलांना सावरणारी मुंबईतील जीवन संवर्धन फाउंडेशन कशी सुरु झाली आणि त्यामागे काय प्रेरणा होती यबरोबरच त्यांच्या कार्य पद्धतीबद्दल थोडक्यात माहिती आपल्याला बरेच काही शिकवून जाईल.

अक्षया ट्रस्टचे नारायणन  कृष्णन आणि भिका-यांचे डॉक्टर अभिजीत सोनावणे या सेवाव्रतींमधे एका क्षणी कसा बदल झाला आणि दोघांनीही आपापली यशस्वी कारकीर्द त्याग करुन आपले जीवन वृद्धांसाठी कसे वाहून घेतले हे वाचून आपल्यालाही प्रेरणा मिळेल. प्रकल्प व्यवस्थापनाबद्दलची माहिती आपल्याला निश्चितच उपयोगी पडेल. त्यासंबंधी एक चर्चा सत्र तर होईलच. याबाबत आपल्या समस्या अथवा प्रश्न आम्हाला कळवल्यास चर्चा सत्रात त्याबद्दल विषेश लक्ष देता येइल.

सेवातरंग दोन या अंतर्गत या शेवटच्या अंकात निरोप घेताना शेवटी आपल्या आतापर्यंतच्या सहभागाबद्दल आभार. गेल्या संपूर्ण वर्षामधे आपण वेगवेगळे विषय हातळले. सेवासंस्था व सेवाव्रतींची माहिती घेतली. या सर्वांचा आपल्या संस्थेच्या संचालनात व कार्यात आपल्याला उपयोग होत राहील, नवीन नवीन प्रकल्प आपण उभे कराल व समाजोपयोगी भरीव कार्य यातून निर्माण होऊ शकेल हीच सदिच्छा.

॥ एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ ॥

– विक्रम पंडित

# २. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

## २.१ समतोल फाऊंडेशन

### ध्येय आमुचे बाल प्रेमी समाजाचे

सामाजिक क्षेत्रात काम करतांना अनेक पैलू उलगडावे लागतात. शिवाय सर्वांबरोबर त्याच भाषेत उत्तरे व संपर्कही ठेवावा लागतो. समतोल फाऊंडेशन ही फक्त संस्था नसुन एक सामाजिक बालप्रेमी चळवळ सुद्धा आहे. समतोलच्या मनपरिवर्तन केंद्रात दाखल झालेली मुले ही शैक्षणिक वंचित तर असतातच शिवाय शोषित व अत्याचारीत सुद्धा असतात. आपले हक्क अधिकार या सगळ्या गोष्टी त्यांच्या पासून खूपच दूर आहेत. याच मुलांना जेंव्हा विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी किती कष्ट व प्रयत्न होतात याची जाणीव जो कार्यकर्ता यांच्या बरोबर राहतो, वागतो त्यांनाच माहित असते. लैंगिक अत्याचार हा विषय सर्रासपणे होताना दिसतो. याचे कारण असे आहे की, जेंव्हा बदलापुर सारखी घटना घडते तेंव्हा अशा प्रकारच्या घटना व त्याची बातमी देणारे बातमीदार यांची जणू स्पर्धाच लागते व एका पाठोपाठ एक अशा घटना झळकु लागतात.

त्यामुळे ही प्रकरणे सातत्याने होत असतात, असाच त्याचा अर्थ निघतो. मग ही प्रकरणे दाबून का ठेवली जातात. तर याची कारणे वेगवेगळी आहेत. हीच गोष्ट समाजात जनजागृति चांगल्या प्रकारे होण्यासाठी समतोल जनजागृती अभियान राबवित असते. समतोलच्या १२ प्रकल्पांपैकी एक विषय हा आहे. पण याची दखल समाजाने घेतली पाहिजे. शाळा, कॉलेज, हॉस्टेल, बालगृह एवढेच नव्हे तर वस्ती, झोपड्या, बिल्डिंग सोसायट्या सर्वच ठिकाणी याबाबत जागरुकता झाली पाहिजे. समतोलची सुद्धा एक मर्यादा आहे, पण समस्या खूप आहेत. जेवढा समाज या कार्यासाठी जोडला जाईल तेवढाच विस्तार होणार आहे. म्हणून बालप्रेमी समाज निर्माण करायचा असेल तर आपल्याला सर्वांनाच या कार्याशी जुडले पाहिजे. समतोल हा फक्त आपलाच वैयक्तिक विषय असता कामा नये तर तो सामाजिकच असला पाहिजे.

समाजात डोळे उघडून पाहिले असता आपल्या आसपास संपूर्ण देशात मोठमोठ्या तीर्थस्थळी, मोठी मंदीर, गार्डन व इतर ठिकाणी असंख्य मुलं दिसून येतात अशिक्षित विस्कटलेले केस, पायात चप्पल नसते, अंगावरचे फाटलेले कपडे, केवीलवाणा चेहरा असलेली मुले जी समाजाने दूर फेकलेली असतात. आणि झिडकारलेली असतात. असंच काही कामानिमित्त नाशिक मध्ये गेलो असताना गोदावरी नदीच्या घाटावर काही मुले भेटली भीख मागणे, श्रद्धेने काही भावीक नदीत पैसे टाकतात, ते पाण्यातील पैसे काढणे, कधी तरी चोरी करणे, वस्तू विकणे अशी वेगवेगळी कामे करत असतात. देशात जिथे जिथे तिर्थक्षेत्र आहे तिथे तिथे अशा प्रकारे काम करणारी अनेक मुले दिसून येतील. या मुलांना घेऊन मात्र शासन, प्रशासन, सरकार, महिला व बाल विकास विभाग, सामाजिक विभाग आणि चाईल्ड लाईन या परीवार सोबत व मुलांसोबत कामे करताना मी आतापर्यंत तरी बघितले नाही. संस्था, संघटना थोड्याफार प्रमाणात काम करताना काही काही ठिकाणी दिसतात.




कारण हा एक वेगळाच विषय आहे. अनेक स्थलांतरित कुटुंब, अशिक्षित पालक, नशेची सवय, बेशिस्तपणा, वाईट सवयी अशा अनेक गोष्टी परिस्थितीनुसार हे पालक आणि मुले करत असतात परंतु ही सुद्धा माणसेच आहेत. मुले ही मुलेच असतात याची दक्षता घेऊन काळजी व संरक्षण समाजाने केले पाहिजे यासाठी सकारात्मक नियोजन असणे शिवाय सातत्याने इच्छाशक्ती सुद्धा असली पाहिजे तरच हे शक्य आहे. समतोल फाऊंडेशन ने हा प्रयोग हरिद्वार मध्ये गंगाघाटावर असणाऱ्या व गंगेच्या पाण्यात उडी मारुन पैसे काढणारे मुलांसाठी २०१३/१४ मध्ये स्वतः केला.

सर्व मुलांना एकत्र करुन विश्व हिंदू परिषद यांची मदत घेऊन २ तास शिक्षणाचे अशी शाळा चालवली पुढे सातत्याने हे कार्य चालवणे समतोल फाऊंडेशनसाठी शक्य नव्हते. परंतु एक प्रयोग दाखवून दिला. हाच प्रयोग आम्ही विदर्भात शेगांवचे गजानन महाराज संस्थान यांच्या इथे सुद्धा २०१७ मध्ये केला जी मुले गंध लावून पैसे कमावतात त्यांच्यासाठी होता या मुलांना संस्थानाच्या शाळेत दाखल करुन घेतले यासाठी समाजाची साथ शासन प्रशासन सोबत असणे आवश्यक असते. हाच प्रयोग नाशिक किंवा अन्य तिर्थक्षेत्रांमध्ये मुलांच्या विकासासाठी होऊ शकतो. २६ जुलैला एक लहान आदेश नावाचा मुलगा गोदावरी घाटावर भेटला. खूप छान बोलला. एवढा लहान असुन त्याने लुक्या, भुरया, इलायती अशी नावे असणाऱ्या ६०/७० मित्रांना जमा केले. सगळी मुलं खूप विचित्र बोलत होती.

९ ते १२ वर्षाची ही मुले लैंगिक विषयावर जास्त बोलतात कारण खुल्या वातावरणात त्यांचे लक्ष याकडे जास्त जाते पुढे भविष्यात ही मुले पैसा मिळवण्यासाठी गुन्हेगारी क्षेत्रात जास्त आकर्षित होतात. या मुलांचे काय होते किंवा होणार हे तुम्हांला कळलेच असेल याचा त्रास समाजालाच होणार म्हणजे आपल्यालाच होणार आहे. त्यामुळे समाजात अशी अनेक सामाजिक कार्य करता येऊ शकतात म्हणून समतोल ही बाल प्रेमी चळवळ चालविणारा मोठा परिवार आहे. मुलांचे पालक नाही तर त्यांचे मित्र, गुरु आणि गाईड बना नेहमी लक्षात ठेवा की, तुमची मुलांच्या संरक्षणाची जबाबदारी शाळेच्या आवारा बाहेर पडल्यावर संपत नाही. तर मुलं शाळेबाहेर असूनही तुम्ही त्यास मदत केल्यास त्याचे जीवनच बदलू शकते. तुम्हांला त्यासाठी फक्त स्वतःला तयार करण्याची गरज आहे. आणि त्याचे प्रश्न समजून घेण्याची आवश्यकता आहे. मग तुम्ही त्यांना मदत करु शकता.

एकदा का तुम्ही मनावर घेतले आणि त्यांचे प्रश्न समजून घेतले तर तुम्ही खूप काही करु शकता. ज्याचा तुम्ही स्वप्नातही विचार केला नसे. मुलांना कुठेही कधीही दुर्लक्षित, शिव्याशाप, मारामाऱ्या वा धमक्यांना सामोरे जावे लागते. काही गुन्हे हे शाळेच्या प्रांगणातही घडू शकतात, पण त्याही पेक्षा जास्त मुले हे गुन्ह्यांना शाळेबाहेर वा घरी सामोरे जातात. तुम्ही त्याकडे दुर्लक्ष न करता त्यांना विश्वासात घेऊन सर्वतोपरी मदत केली पाहीजे. जेंव्हा तुम्हांला समजेल की काही तरी चुकते आहे आणि तुम्ही ते समजून घेण्यास वेळ द्यावा आणि ऊत्तर शोधून काढावे. शाळेचे वातावरण बदलणे हे तुमचे, आमचे सर्वांपुढेच खरंच मोठे आव्हान आहे. मुलांचे मानसिक व इतर प्रश्न सोडवू शकेल व मुलांना ना व पालकांना त्यातून मार्ग काढण्यास मदत करेल असा जाणकार असलेला सायकोलॉजीस्ट शाळेत नेमणे गरजेचे आहे. मुलांचे हक्क शिकवणाऱ्या शिक्षकांबरोबर शैक्षणिक कार्यक्रम वेळोवेळी व्हायलाच हवेत.

सामान्य ज्ञान विषयात लैंगिक शिक्षण हे शाळेत प्रत्येकाला शिकवले गेले पाहिजे. शाळेत प्रसाधनगृह वा पिण्याच्या पाण्याची चांगली सोय असणे गरजेचे आहे. मुलांसाठी व मुलींसाठीचे टॉयलेट वेगवेगळे व एकमेकांपासून दूर असले पाहिजे. शाळांनी मुलांवर होणाऱ्या अत्याचाराचे परिक्षण करण्यासाठी काही मुले पालक पंचायत नगर परिषद किंवा देखरेख करणारे कर्मचारी किंवा एखादे मंडळ स्थापन करावे. याचे काम म्हणजे अशा प्रकारच्या घटना घडल्यास तातडीने त्याची शाहनिशा करुन पोलीसांतर्फे किंवा उपयुक्त व्यक्तीला भेटून कारवाई करणे. मुलांच्या विशिष्ट गुणांना समजून घेऊन त्याचा आदर करुन त्यांच्यातील स्वाभिमान जगवणे गरजेचे आहे. त्यांच्यात सामाजिक वागणूक स्वाभिमान आणि चारित्र्यता वाढवणे गरजेचे आहे.







मुलांच्या वाढत्या गरजांचा व जगण्याच्या पद्धतीचा आदर केला पाहिजे. मुलांच्या पुढे जाण्याच्या स्वभावाचा व जगाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाचा आदर करायला पाहिजे. मुलांच्या बाबतीत न्याय स्वच्छ व अचूक देणे गरजेचे आहे. त्यांच्यात मिळून मिसळून वागण्याची वृत्ती वाढायला हवी. व्यंग असलेल्या मुलांना त्यांच्या व्यंगाबद्दल सारखी जाणीव करुन देऊ नका. त्यांना इतर मुलांसारखीच वागणूक द्यायला हवी. इतर मुलांसमोर त्यांना कमी लेखू नका हिणवू नका. फक्त गरीब घरातीलच मुले पळून जातात असे नाही तर मोठ्या सधन कुटूंबातील सुद्धा मुले घर सोडून पळून जाण्याचे प्रकार समाजात दिसून येतात. काळजी न घेतल्याने, दुर्लक्षित केल्याने, पालक व शिक्षकांकडून मारहाण होण्याची भिती. कधीतरी जातीय भेदभाव, लैंगिक अत्याचार, मुलांना समजून न घेता आरोप केल्याने मुलं घरातून पळतात.

प्रत्येक मुलगा हा स्वतःच्या आत्मविश्वासाने जगत असतो. पालकांनी त्यांना विश्वासात घेणे गरजेचे आहे. रस्त्यावरच्या मुलांच्या संख्येत जास्तीत जास्त मुले घरातून पळालेली असतात. मुलं आपले घर त्यांच्या भवितव्यासाठी किंवा नोकरीच्या शोधात मोठ्या शहरांचे आकर्षण किंवा घरच्यांच्या भांडणांमुळे पळून जातात व भयानक आयुष्य जगतात. रस्त्यावरची मुले वाईट नसतात ज्या परिस्थितीत ते जगत असतात ती परिस्थिती वाईट असते. या मुलांनातर दोन वेळचे जेवणही मिळणे कठीण असते. एकदा रस्त्यावर आले की ते सामाजिक अत्याचाराला अनेक संकटांना तोंड देत असतात. आपल्या पेक्षा वयाने मोठे असणाऱ्या मुलांसोबत मैत्री केल्याने ते लवकरच मारामाऱ्या, शिव्या, व्यसने अशा गोष्टींच्या आहारी जातात. वेगवेगळ्या प्रकारची सहजा सहजी मिळतील अशी कामे ते पटकन शिकतात. भिक मागणे, भंगार वेचणे, चोरी करणे अशा गोष्टीत तरबेज होतात.

भारतातील शिक्षण पद्धतीने आपण घडवत असलेल्या ज्ञानींना सर्व जगात मान आहे. म्हणूनच खुप भारतीय शास्त्रज्ञ, इंजिनीयर किंवा इतर व्यवसायिक हे परदेशात स्थायिक झालेले आहेत आणि त्यातील काही देशात व परदेशात स्वतःसाठी व देशासाठी चांगले काम करत आहेत. कडक शिस्त व स्पर्धात्मक परिक्षा पद्धती हाच उत्तीर्ण होण्याचा मार्ग आहे. सर्व पालकांना आपल्या पाल्याने पुढे मोठे होऊन जास्तीत जास्त पैसे कमाविले पाहिजे असे वाटते. पण वेगवेगळ्या स्पर्धांचा दबाव, मुलांकडून वाढत्या अपेक्षा, आपल्या शाळेचा १०० टक्के निकाल यासाठी मुलांवर दबाव टाकला जातो आणि ह्या अपेक्षांची पुर्तता मुले करु न शकल्यामुळे मुलांमध्ये मानसिक अस्वस्थता वाढून ते कधी कधी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. आपण वेळीच ह्या सत्याला सामोरे न गेल्यास येणाऱ्या नवीन पिढीच्या भवितव्याला मुकू शकतो. मानसिक शिक्षा ही गोष्ट अनेक पालकांकडून घडतच असते. शाळेतही शिक्षकांकडून ह्या शिक्षेला अनेक विद्यार्थी बळी पडतात.

मुलांना आपली भीती वाटणार नाही तर आपण त्यांचे मित्रच आहोत या प्रमाणे मुलं सुद्धा आपल्यासोबत तसाच व्यवहार करतील या करता शाळेत काही बदल काही गोष्टी घडणे करणे गरजेचे आहे. जसे की मुलांना छंद जोपासण्यास मदत होईल. मुलांमध्ये त्यांना समजतील त्यांना कळतील अशाच विषयांवर चर्चासत्र, वाद संवाद, प्रश्न उत्तरे असे छोटे कार्यक्रम करणेच गरजेचं आहे. मुलांना इतिहासातील शूरवीरांच्या गोष्टी सांगणे, चित्र काढणे चित्र रंगवणे त्यामुळे मुलांच्यात उत्साह दिसून येतो. नाट्य एकांकिका थिएटर स्टेजवर वावरण्याचा आत्मविश्वास येतो. कुंभारकाम वस्तुकला आपल्या संस्कृतीची ओळख होते. शालेय सहली, फोटोग्राफीमुळे विविध प्रकारच्या निसर्गाचा आनंद घेता येतो. विविध प्रकारचे पारंपारीक मैदानी खेळ खेळल्याने अंगात स्फूर्ती उर्जा निर्माण होते. ऐतिहासीक संग्रहालयाला भेट किंवा वस्तु कला शिबीराला भेट दिल्यास इतिहासकालीन गोष्टींची माहिती मिळते.

## मनपरिवर्तन केंद्रातील नियम व संस्कार, संस्कृती

श्रावण महिण्यात एका पाठोपाठ सगळे सण येण्यास जणू काही पाऊस आणि सणांची रेलचेलच असते. निराधार, निराश्रित, ब्रिजखालील, वस्तीमधील, झोपडपट्टीतील, डोंगरावर राहणारी एक पालक अशी ही मुलं त्यांचे पालक जे काम करतात तेच काम ही मुले सुद्धा करतात कारण परिस्थीतीमुळे त्यांना हे करणेच भाग असते, भंगार वेचणे, प्लॅस्टीक बाटल्या, पिशव्या गोळा करणे, लोहचुंबक लाऊन लोखंडी खिळे व इतर वस्तू गोळा करणे या गोष्टी रोजच्याच ठरलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना शाळा नाही, अभ्यास नाही, आणि मग सणवार, संस्कृती या गोष्टींची माहितीच होत नाही. रोजचे काम करायचे ते विकून येईल त्या पैशात काहीतरी खायाचे आणि उरलेले पैसे व्यसनात उडवायचे या मुलांना ना वर्तमानाची चिंता असते ना भविष्य माहित असते. त्यांना फक्त आला दिवस ढकलायचा एव्हढेच माहित असते. जेंव्हा अशी मुलं समतोल फाऊंडेशनच्या स्वामी विवेकानंद मनपरिवर्तन केंद्रात दाखल होतात. तेंव्हा त्यांना शिस्त, आचार, विचार, सणवार, हिंदू संस्कृती याची जाणिव करुन दिली जाते. महाराष्ट्रातल्या सणांचा सुद्धा आनंद घेण्यासाठी त्यासणाचे महत्व व संस्कृती समजण्यासाठी केंद्र सर्व सण साजरे करते. ज्यामुळे मुलांना सणांची माहिती होतेच शिवाय आपली संस्कृती जोपासण्यास त्यांची मनोवृत्ती तयार होते. केंद्रातील अधिक्षक अश्विनी मॅडम या केंद्रातील मुलांच्या आई प्रमाणेच सांभाळ करतात. कारण ही मुलं आपल्या पालकांना सोडून इथे आलेली असतात. त्यांना सोबत घेऊनच सगळे सणवार साजरे केले जातात, पुजा, आरती, प्रसाद इ. केंद्रात बाप्पाची संकष्टी चतुर्थी मोठ्या उत्साहात साजरी केली. सणवाराला गोडधोड जेवण असल्याने मुलं आणखीनच आनंदी होतात. आपणांस एक विनंती आहे की दिवसाचा १ रु. सुद्धा सामाजिक कार्यात मोठा सहभाग होऊ शकतो. आपण सामाजिक बांधिलकी म्हणून या चळवळीसाठी योगदान करावे.

धन्यवाद !


**- संपर्क**

**विजय जाधव**

**संस्थापक - समतोल फाऊंडेशन**

**मोबाईल क्रमांक : 9892961124**

# २. सामाजिक संस्था व त्यांचे कार्य

## २.२ बेघर मुलांना सावरणारी "जीवन संवर्धन फाऊंडेशन"

मुंबई मायानगरी. कोणालाही उपाशी न ठेवणारी नगरी. सतत वाहत असणारे हे शहर. धावपळ, वेग हे या शहराचे वैशिष्ट्य. रेल्वे स्थानक, फलाट हे तर कधी स्तब्ध नसतातच. पण या फलाटावर जरा नजर फिरवली तर दिसतात शून्यात नजर लावून बसलेली मुले. या मुलांचा जगाशी काहीही संबंध नसतो. डोळ्यात नशा असते, कसलीच जाणीव नसते. त्या मुलांना बघून असंख्य जणांचे मन हळहळते पण आपण काय करणार या विचाराने ते दृश्य डोळ्याआड करत मार्गस्थ होतात. पण मुंबईतली दीडशेजण आहेत जे या मुलांना समाजाशी जोडण्यासाठी आपले नोकरी व्यवसाय सांभाळून कष्ट घेत आहेत. या मुलांना शिक्षण आणि जीवनप्रवाहात आणण्यासाठी धडपडत आहेत. आणि या सर्वांना जोडणारे एक समान सूत्र आहे जीवन संवर्धन फाऊंडेशन. या संस्थेचे संस्थापक सदाशिव चव्हाण यांनी तयार केलेले हे सर्व स्वयंसेवक आहेत. आज मुंबईत सुमारे सव्वा लाख बेघर मुले आहेत. हे अनाथ नाहीत तर बेघर आहेत. या मुलांचे नातेवाईक असतात. पण यांना डोक्यावर छप्पर नसते. मग आयुष्यही रस्त्यावर वाहून जाते. या बेघरांना बघून अस्वस्थ झालेल्या सदाशिव चव्हाण यांनी त्यांचे आयुष्य सुधरायचे ठरवले. ते सांगतात, मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघांशी लहानपणापासून जोडलेला आहे.

महाविद्यालयीन शिक्षण सुरु असतानाच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे काम करत होतो. शिक्षण पूर्ण झाल्यावर काही काळ अभाविपचे पूर्ण वेळ काम केले. त्याचवेळी मी ठरविले होते की समाजाच्या अत्यंत दुर्लक्षित घटकांसाठी काम करेन. मी अभाविपचे काम थांबवून वैयक्तिक आयुष्य सुरु केले. नोकरीनिमित्त मला मुंबईला यावे लागले. एक दिवस मला ईशान्य भारतातून एका सामाजिक कार्यकर्त्याचा फोन आला. त्याच्या भागातील दोन मुली गायब झाल्या होत्या. त्यांना मुंबईच्या रेड लाईट एरियात आणल्याचे त्याला कळले होते. त्यांना सोडविण्यासाठी मला विनंती केली होती. मी फॉरस रोडच्या पोलिस ठाण्यात जाऊन त्यांना मदत करण्यासाठी गळ घातली. फारसा उपयोग होणार नाही असे तेथील पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले पण तरीही दुसऱ्या दिवशी छापा टाकला. त्या मुली नाही पण ईशान्य भारतातल्या इतर दोन मुली सापडल्या. त्यांना परत पाठवायचे तर त्यांना घरचा पत्ता सांगता येत नव्हता. अल्पवयीन असल्याने त्यांना डोंगरी बाल सुधारगृहांमध्ये ठेवण्यात आले. त्यांना सुधारगृहातून सोडविण्यासाठी मी तिथे वारंवार जात होतो. तेव्हा मला बेघर मुलांचे विश्व दिसले. संवेदनशील व्यक्तीला समाजातल्या समस्या दिसल्या की त्या सोडविण्यासाठी आपण काय करु शकतो याचा विचार सतावत राहतो.

सुधारगृहातल्या एकेका मुलाची कहाणी ऐकल्यावर चव्हाण अस्वस्थ झाले. साधारणतः चोरीच्या प्रकरणातील आरोपी सापडत नसतील तर या मुलांना पकडायचे आणि केस सुटली असे दाखवायचे, ही पोलिसांची पध्दत असल्याचे चव्हाण यांच्या लक्षात आले. दोनशे रुपयांच्या चोरीच्या आरोपावरुन एक मुलगा आठ महिने त्या सुधारगृहांमध्ये होता. केस उभी राहण्याची शक्यता नव्हती. अशी अनेक मुले तिथे होती. या मुलांसाठी काम करणारी राणी त्यांना तिथे भेटली. त्यातून त्यांच्या समस्या समजत गेल्या. २००८ ची ही गोष्ट होती. याच मुलांसाठी आपण काम करावे हा विचार हळू हळू पक्के झाले, चव्हाण सांगतात. वाट खूप अवघड होती. पण जितके आव्हान मोठे तितका काम करण्याचा आनंद मोठा हे माझे मत, त्यामुळे कामास सुरुवात केली, चव्हाण सांगतात. ९९ टक्के बेघर मुले लैंगिक शोषणाचे बळी असतात. त्यामुळे अनोळखी व्यक्ती जरा जवळ येतोय असे वाटले की ती ताबडतोब पळून जातात. ही मुले कायम मादक पदार्थांच्या अमंलाखाली असतात. त्यामुळे त्यांच्याशी संपर्क करुन संवाद साधणे महाकठीण. या मुलांचा रात्री १२ नंतर रेल्वे फलाटावर अड्डा जमतो हे चव्हाण यांच्या लक्षात आले. मग त्यांनी त्यांच्यासोबत जाऊन बसायला सुरुवात केली. हळूहळू दोन मुलांनी प्रतिसाद देण्यास सुरुवात केली. सहा-आठ महिन्यानंतर जरा त्यांना शिक्षणासाठी तयार केले. मुले तयार झाली तरी त्यांच्या पालकांना राजी करणे हेही अवघडच होते.



एकतर ही मुले कमाईचे साधन असतात. पालकांची परवानगी मिळायला आठ-नऊ महिने असे करत जवळपास दीड वर्षाने दोन मुलांबाबत यश मिळाले. पण त्यांना ठेवायचे कुठे हा प्रश्न होताच. घरात ईशान्य भारतातल्या मुली होत्याच. मग चव्हाण आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जीवनसंवर्धन फाऊंडेशनची स्थापना करुन या मुलांसाठी वस्तीगृह सुरु केले. २०१० मध्ये हा प्रयोग सुरु झाला. या मुलांना परत प्रवाहात आणणे खूप अवघड असल्याचे या दोन मुलांच्या अनुभवातून लक्षात आले होते. हे काम एकट्या दुकट्याचे नाही, हेही लक्षात आले. मग ते स्वतः काम करतच होते पण त्यांनी आपले नेटवर्क वाढवायला सुरुवात केली.रोज लोकलने प्रवास करणारे संवेदनशील नागरिक यांची मदत घ्यायची ठरवली. असे काहीजण मिळालेही. त्यांना व्यवस्थित प्रशिक्षण दिले. या मुंबईकरांचे कार्यक्षेत्रही ठरवून दिले. ज्या  ठिकाणी राहतात ते स्थानक आणि ज्या स्थानकात उतरुन ऑफिसला जातात ते. या स्थानकांतील फलाटावरच्या मुलांशी संपर्क करायचा. त्यांच्याशी मैत्री होण्यासाठी दोन तीन महिने जाणार हेही त्यांना सांगितले जाते.

सुरुवातीला येता-जाता फक्त हसायचे, हात दाखवायचा. टप्प्यावर मैत्री करायची.  जरा जवळ जाऊन एखाद वाक्य बोलून संवाद सुरु करायचा. मग वडापाव, सामोसापाव द्यायचा. तो त्यांनी घेणे हे सुधारणेचे पहिले पाऊल असते. मग वेळ मिळेल तशा गप्पा मारायच्या. त्यांच्या मनात विश्वास निर्माण करायचा. त्याला शाळा, वसतीगृह याची माहिती द्यायची. त्याला तयार करायचे. त्याच्या मनाची तयारी झाली मग त्याचे जे कोणी पालक असतील त्या पालकांची परवानगी मिळवायची. हे पण तितकेच अवघड काम असते. कारण त्यांच्यासाठी ही मुले म्हणजे कमाविणारे हात असतात. ते कमी होणे त्यांच्या पचनी पडणारे नसते.  पण आपल्या मुलाचे आयुष्य आपल्यापेक्षा वेगळे आणि चांगले असेल हे पटले की मग या मुलांचा गुरुकुलाकडे प्रवास सुरु होतो. पण प्रवास इतका सोपा नसतो. या मुलांना जडलेल्या व्यसनांवर उपाय केला जातो. वैद्यकीय तपासणी होते.  त्यांना काही आजार असेल तर उपचार करायचे. मधल्या काळात या मुलांच्या शाळा प्रवेशासाठीच्या कागदपत्रांची जुळवाजुळव सुरु केली जाते. हा सर्व कालावधी दिड ते दोन वर्षांचा असतो.

पहिल्याच वर्षात तेरा मुले दाखल झाली होती. मुळात या मुलांना एकाच ठिकाणी राहण्याची सवय नसते. त्यामुळे त्यांना चार भिंतीत राहण्याची सवयही आम्हाला लावावी लागते, सदाशिव चव्हाण सांगतात. या मुलांनी फक्त वडापाव, समोसापाव आणि कधीतरी कोणी तरी दिलेले शिळे -उरलेले अन्न खायची सवय असते. आंघोळ तर कधी करत नाहीत. म्हणजे अंगावरचा कपडाही धुतला जात नाहीत,स्वच्छता नाहीच. त्यात व्यसन त्यामुळे या मुलांचे आयुष्य केवळ ३०-३५ एवढेच असते. मुंबईत लाख-सव्वा लाख आणि देशभरात अंदाजे १८-२० लाख एवढी संख्या असलेला वर्ग पूर्णपणे दुर्लक्षित आहे केवळ तो राजकीयदृष्ट्या काही फायदा नसल्याने हे घडते यांची खंत चव्हाण व्यक्त करतात.हे काम २०१० ला सुरु केले. तेव्हापासून आजपर्यंत ८६ मुले आपल्या आयुष्यात स्थिरावली आहेत. घर भाड्याने घेऊन राहत आहेत. या मुलांना आम्ही त्यांचा कल बघून कौशल्य विकास प्रशिक्षण दिले. स्वतःच्या पायावर उभे राहता येईल ते शिक्षण देण्यास प्राधान्य असते, चव्हाण माहिती देतात. ही संस्था फक्त वस्तीगृह चालवते. या मुलांना समाजात वावरण्याची सवय व्हावी यासाठी शिक्षणाचा अधिकारातून आजूबाजूच्या शाळेत या मुलांचे प्रवेश केले जातात. या मुलांवर वस्तीगृहाबाहेर  जाण्यावर बंधन नसते.

कारण त्यांना या चार भिंतीतल्या सुरक्षेचे महत्त्व कळलेले असते. पाच –सहा वर्षांपर्यंतची मुले जर मिळाली तर त्यांच्या मनाची पाटी कोरणे सोपे असते पण जितकी मोठी मुले येतात तितके त्यांच्यावर अधिक काम करावे लागते. त्यांना समुपदेशन देऊन त्यांच्या मनावरचे आघात पुसण्याचा प्रयत्न केला जातो. सामान्य घरातील मुलांना १६–१७ वर्षांपासून ज्या लैंगिक गोष्टी कळू लागतात, त्या मुलांनी अगदी लहानपणापासून बघितलेल्या असतात, भोगलेल्या असतात. त्यामुळे त्यांना याबाबतचे समुपदेशन केले जाते. या मुलांचे आयुष्य बघितले की आपण समाज म्हणून आपली जबाबदारी पार पाडण्यास असमर्थ आहोत, अशी खंत ते व्यक्त करतात. पण समाजाला तरी कसा दोष देता येणार कारण आपल्या जगण्याची व्यवस्था बदलल्याने अशी मुले तयार झाली आहेत. बारा बलुतेदार प्रथा बंद झाली आणि मग वैदू, कैकाडी आदी भटक्या जमातींच्या हाताला काम राहिले नाही. मग ते शहरांमध्ये रोजगाराच्या शोधात आले. मुळात एका जागी मुक्कामाची सवय नसल्याने घरांची गरज त्यांच्या पालकांना वाटत नाही.अशीच मुले ९५ टक्के आहेत. बाकीची अनैतिक संबंधातून जन्माला आलेली किंवा घरातून पळून आलेली मुले असतात. मी जरी समाजाला दोष देत असलो तरी याच समाजाच्या सहभागातून हे काम चालते, अशी कबूलीही ते देतात. या मुलांचा संपूर्ण खर्च हा देणग्यातूनच भागतो.

फक्त शैक्षणिकच नाही तर या मुलांच्यातील कलागुण, क्रीडा नैपुण्य जोपासण्याचा प्रयत्न आम्ही करतो. यासाठी विविध संस्था आम्हाला मदत करतात, मुलांनाही त्यात गती आहे, अनेक स्पर्धांमध्ये भाग घेऊन बक्षीसेही मिळवली असल्याचे, चव्हाण अभिमानाने सांगतात. सध्या या संस्थेत मुलगे आणि मुली मिळून १७१ जण आहेत. मुलीसाठी ठाणे शहरातील हरी निवास सर्कल परिसरात गुरुकुल आहे. तर मुलांची सोय टिटवाळा येथे केली आहे. बदलापूरमध्ये सर्वांची एकत्र सोय करण्याच्यादृष्टीने वस्तीगृहाचे बांधकाम सुरु आहे. कोणत्याही संस्थेची प्रगती व्हावी, अशीच संस्थापकांची इच्छा असते. पण या संस्थेची गरजच राहू नये आणि जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाच्या डोक्यावर छप्पर असावे, जगण्यासाठीच्या मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात, हीच इच्छा आमची आहे. हे झाले की जीवन संवर्धन सारखी कृत्रिम व्यवस्था लागणारच नाही, आणि आम्ही आमचा प्रकल्प बंद करु, हेच आमचे स्वप्न असल्याचे चव्हाण सांगतात. सदाशिव चव्हाण यांचे हे स्वप्न पूर्ण होवो, याच सदिच्छा.






[मुंबईकरांचे मदतीला धावून जाण्याचे स्पिरीट आहे. त्या स्पिरिटमुळेच जीवनसंवर्धनला स्वयंसेवक मिळत गेले. एका स्वयंसेवकाचा किस्सा सदाशिव चव्हाण यांनी सांगितला. तो स्वयंसेवक लोकलने चालला होता. त्याने उगीच लोकलची चेन खेचली आणि गाडी थांबवली. रेल्वे पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. न्यायालयात हजर करायचे होते. पण न्यायालयाची वेळ संपल्याने त्याला जवळच्या स्थानकावर नेऊन पोलिस कक्षात बसवले. रात्रभर तिथेच ठेवले. पोलिसांशी गप्पा मारताना त्याने जीवन संवर्धनची माहिती दिली. दुसऱ्या दिवशी त्याला न्यायालयासमोर हजर करून दंड भरल्यानंतर सोडून देण्यात आले. दोन महिन्यांनी त्याला त्या पोलिसांचा फोन आला एक १२ वर्षांचा चांगल्या घरातील मुलगा पळून आला आहे. त्याला खूप समजावले पण तो परत जायला तयार नाही. तुम्ही भेटा आणि शक्य असेल तर त्याला तुमच्या संस्थेत घेऊन जा. त्या स्वयंसेवकांने त्याला संस्थेत आणले. तो मुलगा चांगला शिकला. तो दक्षिण आफ्रिकेत नोकरी करत आहे. वस्तीगृहात असलेल्या एका मुलाची आईही स्वयंसेवकाचे काम करु लागली आहे.]

[समाजाच्या मदतीबाबत तर बोलावे तितके कमी. याबाबतचा एक अनुभव चव्हाण यांनी सांगितला. माझ्याकडे एक गृहिणी आली. तिला संस्थेला काहीतरी मदत करायची होती. मी कोणाकडे जाऊन पैसे मागणार नाही असे तिने आधीच सांगितले. मग मी तिला एक पर्याय दिला. वस्तीगृहात एक वेळ २५० पोळ्या लागतात. महिन्यातून एकदा २५ घरात जाऊन संस्थेची माहिती सांगायची आणि त्यांच्याकडून प्रत्येकी दहा पोळ्या आणायच्या. गेली चार महिने नेमाने महिन्यातून एकदा तिने पोळ्या आणून दिल्या आहेत.]




- संपर्क
सदाशिव चव्हाण
जीवन संवर्धन संस्था
मोबाईल क्रमांक :7506927704

# ३. प्रकल्प व्यवस्थापन - शास्त्र आणि एक कला

**परिचय:**

या लेखात आपण प्रकल्प व्यवस्थापनातील काही मूलभूत तत्वांविषयी चर्चा करणार आहोत – विशेषतः सामाजिक आणि स्वयंसेवी संस्थांना भेडसावणाऱ्या समस्यांच्या अनुषंगाने. प्रकल्पांचे प्रभावी व्यवस्थापन एखाद्या संस्थेच्या यश आणि अपयशामध्ये निर्णायक ठरु शकते.


प्रोजेक्ट मॅनेजमेंट इंस्टीट्यूट (www.pmi.org) यांच्या परिभाषे नुसार प्रकल्प म्हणजे एखादा नावीन्यपूर्ण पदार्थ किंवा सेवा किंवा परिणाम साधण्याकरता विशिष्ट कालमर्यादेपुरता उपक्रम आहे. यात दोन गोष्टी ध्यानात घ्यायच्या आहेत. विशिष्ट कालमर्यादा आणि नावीन्यपूर्ण. म्हणजे आपण निरंतर करीत असलेले काम किंवा अगोदरच अस्तित्वात असलेल्या गोष्टींचे उत्पादन म्हणजे प्रकल्प नव्हे. काहीतरी नवीन, सुधारणा जर आपण घडवून आणू पाहत असलो, आणि ते विशिष्ट काळात पूर्ण करण्याचे नियोजन जर असेल तरच त्या उपक्रमाला प्रकल्प म्हणता येईल. नियमित शाखा भरवणे, मंडळाची वार्षिक बैठक घेणे हा प्रकल्प नाही. पण एखाद्या नवीन सामाजिक समस्येवर संशोधन करणे, एखाद्या भागात एखादा नवा उपक्रम राबवणे हे प्रकल्पाचे उदाहरण होऊ शकेल. प्रकल्प व्यवस्थापन करणाऱ्या व्यक्तीला – अर्थात प्रकल्प व्यवस्थापकाजवळ हे वेगळेपण जपताना वेळेचे आणि इतर मर्यादांचे भान ठेऊन कार्य पूर्ण करणे हे कौशल्य असणे महत्वाचे आहे.

प्रकल्प आणि नित्यक्रमातील कार्य: एखाद्या संस्थेत प्रकल्पासोबत नित्यक्रमा प्रमाणे चालणारी अनेक कामे सुरु असतात. अशा कामांना "operations" असे म्हणता येईल. प्रकल्प कार्य आणि नित्यक्रमातील कार्य यात बराच फरक आहे आणि त्याकरता लागणारी कौशल्य, मानसिकता यातही मोठा फरक आहे. प्रकल्प कार्य आणि नित्यक्रमातील कार्य यासाठी माणसे निवडताना याचे भान ठेवणे आवश्यक आहे. थोडक्यात हा फरक नेमका काय आहे ते समजून घेऊया.

| पैलू | प्रकल्प कार्य | नियमित कार्य |
|---|---|---|
| कार्याचा प्रकार | काही नवीन निर्माण करणे नाहीतर आहे त्यात सुधारणा करणे | सातत्याने करायचे काम, नावीन्य क्वचितच |
| कार्यकर्ते | प्रकल्पाच्या गरजेनुसार विशिष्ट क्षमता असलेली टीम | संस्थेचे नियमित कार्य करणारे |
| काल-मर्यादा | ठराविक कालमर्यादा | संस्थेच्या वेळापत्रका प्रमाणे पुढे-मागे |
| उद्दिष्टे आणि निष्पन्न | नावीन्यपूर्ण, आणि सतत उलगडत जाणारे | संस्थेची अगोदरच ठरलेली उद्दिष्टे |
| कार्यप्रणाली | प्रकल्पाच्या गरजेनुसार ठरवावी लागेल | संस्थेच्या ध्येय धोरणाशी संलग्न |
| कार्यकर्त्यांमध्ये लागणारे गुण | सर्जनशीलता, हिकमती स्वभाव, चाकोरीबाहेर विचार करण्याची क्षमता | सातत्य, विश्वसनीयता |
| अपेक्षित परिणाम | नवीन काही घडवून आणणे | आहे त्यातून कार्य साधणे |

प्रकल्पात सर्व काही नवीन असल्यामुळे केवळ ठराविक आणि नित्याचे कार्य करण्याची सवय असलेल्या व्यक्तीचा प्रकल्पात निभाव लगेलच असे सांगता येत नाही. तसेच प्रकल्पात हिकमती आणि हरहुन्नरी असलेली व्यक्ति नित्यक्रमात कंटाळून जाऊ शकते. प्रत्येकाच्या स्वभावानुसार त्याला योग्य ते कार्य देणे हे संस्थेच्या नेत्यांना जमले पाहिजे. दुसरे म्हणजे अनेकदा तीच व्यक्ति प्रकल्प आणि नित्याच्या कार्यात सहभागी असते. अशा वेळी कशाला प्राधान्य द्यावे याबाबत गोंधळ उडू शकतो. नेहेमीच्या कार्यात कर प्रकल्पकडे दुर्लक्ष झाले तर विलंब, खर्चात वाढ आणि अशी झळ पोचू शकते. असे होऊ नये याकरता संस्थेच्या नेतृत्वाने जागरुक पणे आणि नियमितपणे प्रकल्प आणि इतर कार्यात प्रधान्यक्रम ठरवणे, आणि त्यानुसार संसाधनांची व्यवस्था करणे अत्यावश्यक ठरते.

**प्रकल्प व्यवस्थापन कार्यप्रणाली – ५ प्रकारची कार्ये :**
कोणत्याही प्रकल्पात ५ प्रकारचे कार्य अभिप्रेत असतात. प्रत्येक वेळी ते एकापाठोपाठ येतील किंवा विशिष्ट ओघाने येतील असे सांगता येत नाही, परंतु ही कार्य करावी लागतात नक्की. ते काय आहेत आणि त्यांचा परस्परांशी संबंध काय आहे हे खालील आकृतीत पाहायला मिळेल.




**1.Initiating processes (पूर्वतयारी) :**
पूर्व तयारी शिवाय प्रकल्प अस्तित्वात येत नाही. कोणताही प्रकल्प हाती घेणे हा एक विचारपूर्वक घेतलेला निर्णय असतो – ज्यात वेळ, पैसा, संसाधने, परिश्रम यांची मोठी गुंतवणूक आवश्यक असते. म्हणूनच संस्थेने प्रकल्प मुळात कशासाठी करायचा, त्याचे उद्दिष्ट एवढ्या मोठ्या गुंतवणुकीशी सुसंगत आहे का, याचा बारकाईने विचार करणे आवश्यक आहे. प्रकल्प व्यावसायिक स्वरुपाचा असो, वा सामाजिक कार्यातील असो – दोन्ही मध्ये हा विचार केला पाहिजे. या सर्व विचारा अंती प्रकल्प एक तर मंजूर होईल, नाहीतर तो विचार पुढे ढकलला जाईल, नाही तर पूर्णपणे रद्द केला जाईल. प्रकल्प मंजूर अथवा नामंजूर करण्याचा निर्णय हा सहसा संस्थेच्या शीर्ष नेतृत्वाने घ्यायचा असतो, करण प्रकल्पाला लागणारी संसाधने उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी त्यांची असते. प्रकल्प व्यवस्थापक आणि त्याच्या टीम ने प्रकल्पाच्या पूर्तीसाठी नेमके काय करावे लागणार आहे, त्यात काय अडचणी आहेत आणि काय संसाधने लागणार आहेत याचा सरासार विचार करुन ते स्पष्टपणे मांडले पाहिजे. जसे युद्धात नुसतेच "आता तुम्ही लढा" असे देऊन भागणार नाही. त्यासाठी सैनिक, शस्त्रास्त्रे, युद्धनीती याचा विचार पण केला पाहिजे. नाहीतर माघार घेणे अधिक सुज्ञपणाचे. प्रकल्पाचेही थोडेफार तसेच आहे.

### 2.Planning processes (नियोजन) :

असे म्हटले जाते, की नियोजनाचा अभाव म्हणजे पराभवाची निश्चिती! अपुरे नियोजन हा अयशस्वी प्रकल्पाचा जणू पायाच. नियोजनासाठी पुरेसा वेळ देणे अपरिहार्य आहे. नियोजनाचे अनेक पैलू आहेत. नेमके काय करायचे आहे (Scope), कशाला किती वेळ लागणार आहे (Schedule), खर्च काय येणार आहे (Cost), काय संसाधने लागणार आहेत (Resources), कोण भागीदार सोबत लागतील, इत्यादी. जेव्हां प्रकल्पाचे उद्दिष्टे आणि कार्यक्रम महितीतला असतो, तेव्हां संपूर्ण आराखडा सुरुवातीलाच स्पष्टपणे मांडणे इष्ट ठरते. परंतु कधीकधी नेमकी गरज आणि त्यावरील उपाय हे सुरुवातीला ज्ञात होत नाहीत, ते प्रयोगातून शिकत पुढे जावे लागते, तेव्हा, त्याला agile (प्रसंगानुसार बदलता येण्यासारखे) नियोजन असे म्हणतात. काहीही झाले, तरी पुढील दिशा स्पष्ट करण्यासाठी सखोल नियोजन अत्यावश्यकच!

### 3.Executing processes (अंमलबजावणी) :

क्रियेवीणा वाचळता जशी व्यर्थ आहे, तसे नुसतेच कागदावरच्या किंवा भाषणातल्या नियोजनाचा उपयोग सुद्धा शून्य आहे. नियोजित कार्याची अंमलबजावणी करताना टीम ने ती आखणी नुसारच केली पाहिजे. आपली इच्छा होईल तेव्हा, वाटेल तसे काम केल्याने गोंधळ होईल. एखाद्या सैनिकाला दिलेला आदेश जसा तो तंतोतंत विनातक्रार पार पाडतो, तसेच. अर्थात जर कार्य करताना अडचणी आल्या किंवा काही अनपेक्षित घटना घडल्या, तर त्याची सूचना तातडीने प्रकल्प व्यवस्थापक किंवा नेतृत्वाला दिली पाहिजे.

### 4.Controlling processes (नियंत्रण) :


जेव्हां प्रकल्पाचे कार्य सुरु असते, तेव्हां त्यावर सतत नजर ठेवणे, येणाऱ्या अडचणी तत्परतेने सोडवणे ही प्रकल्प व्यवस्थापक आणि संस्थेच्या नेतृत्वाची मुख्य जबाबदारी ठरते. एखादा खेळ सुरु असताना टीम च्या प्रशिक्षक प्रत्येक हलचालीवर बारीक नजर ठेऊन असतो आणि डाव अपेक्षेनुसार पडत नसेल तर तातडीने उपाय शोधत असतो, अगदी तसेच. कधीकधी टीम अपेक्षेप्रमाणे खेळ (कार्य) करीत नसते, किंवा त्यात त्रुटी असतात. त्या दुरुस्त करण्यासाठी त्यांना योग्य feedback (अभिप्राय/सूचना) द्यावा लागतो. कधी कधी नियोजनाच अपुरे ठरल्याचे दिसून येते. अशावेळी पुन्हा एकदा प्राप्त परिस्थितीनुसार फेर नियोजन आवश्यक ठरते. शेवटी कार्य पूर्ण होत आले, किंवा होण्याची शक्यता मावळू लागली, की प्रकल्प बंद करण्याचा (closure) निर्णय घ्यावं लागतो. प्रकल्पावर देखरेख ठेवणे, आपल्या टीम ला पाठबळ, तसेच योग्य वेळी योग्य सूचना देणे आणि योग्य वेळी प्रकल्प नियंत्रणात ठेवण्यासाठी योग्य निर्णय घेणे, ही प्रकल्प व्यवस्थापकाची जबाबदारी असते – ज्यात अनेकदा तो संस्थेच्या शीर्ष नेतृत्वाची मदत घेऊ शकतो.

### 5.Closing processes(पूर्तता) :

प्रकल्प पद्धतशीरपणे पूर्ण करणे, ही पुढील प्रकल्पांच्या आणि उपक्रमांच्या यशाची पायाभरणी आहे. प्रकल्पाच्या उद्दिष्टांची पूर्तता अपेक्षेप्रमाणे झाली असो, वा नसो, योग्य पद्धतीने closure हे जणू प्रकल्पाचे “क्रियाकर्म” किंवा “उद्यापन” आहे आणि अनिवार्यच आहे. पूर्तता करताना काय करावे? नियोजित आणि प्रत्यक्षात आलेले प्रकल्पाचे दृश्य आणि अदृश्य फलित किंवा परिणाम, यांची नोंदणी केली पाहिजे. ती पद्धतशीर पणे लाभ धारकांकडे हस्तांतरित केली पाहिजे. हस्तांतरित करण्यापूर्वी एखाद्यावेळी प्रशिक्षण देणे, देखभाल दुरुस्तीसाठी काही संसाधने उपलब्ध करून देणे, इत्यादी आवश्यक आहे. जेणेकरुन प्रकल्पाचे लाभ हे शाश्वत राहतील आणि निरंतर मिळत राहतील. प्रकल्प बंद करण्यापूर्वी त्यातून आपण काय शिकलो (तांत्रिक, आर्थिक, सामाजिक बाबी) यांची नोंद घेऊन भविष्यात यातून अधिक सक्षम पद्धतीने प्रकल्प कसा राबवता येईल याचा शोध-बोध रीतसरपणे घेतला पाहिजे आणि त्याचे documentation आणि closure report (अहवाल) लिहिला पाहिजे.

**कारभारी, प्रणाली, परिस्थिती :**

प्रकल्प यशस्वी करण्यासाठी त्याचे कारभारी, कार्यपद्धती (प्रणाली) आणि परिस्थिती यांची यथोकहीहत सांगड घालणे आवश्यक आहे. प्रकल्पाचे नेतृत्व हे एक शास्त्र आहे, तसेच कला पण आहे. काही जणांना ही कला न शिकवता - उपजतच मिळालेली असते (उदाहरणार्थ - छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर), तर काहींना शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास आणि परिश्रम करुन, अनुभव घेऊन शिकावी लागते (उदाहरणार्थ – आर्य चाणक्य).




**1.People (कारभारी/भागधारक) :**

कोणत्याही कार्याचे यशापयश हे त्याच्याशी संलग्न असलेल्या लोकांवर अवलंबून आहे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. प्रकल्प व्यवस्थापन शास्त्रात stakeholder असा एक शब्द वापरला जातो. आपण त्याला कारभारी किंवा भागधारक म्हणू. अशी कोणतीही व्यक्ति, किंवा गट किंवा संघटना/संस्था – जी प्रकल्पाला प्रभावित करु शकते, किंवा प्रकल्पाने त्यांच्यावर परिणाम (चांगला किंवा वाईट) पडत असतो, किंवा ज्यांची अशी धारणा आहे (वास्तविक किंवा काल्पनिक) की प्रकल्पाचा माझ्यावर परिणाम होणार आहे – या परिभाषेत मोडणार प्रत्येक जण stakeholder म्हटला जातो. यात आपल्याच टीम चे सदस्य, सेवा पुरवणारे, ग्राहक, देणगीदार, सरकार, नियामक मंडळे, लाभधारक, स्थानिक राजकारणी, स्वतः प्रकल्प व्यवस्थापक, संस्थेचे नेतृत्व करणारे विश्वस्त अथवा संस्थापक अशी अनेक मंडळी येतील. या सर्वांना प्रकल्पाचे महत्व पटवून देणे, त्यांना आपल्यासोबत घेऊन जाणे, कुणाचा विरोध असेल तर तो कमी करणे आणि जास्तीत जास्त लोकांचा पाठिंबा मिळवणे – ही प्रकल्प व्यवस्थापक आणि त्यावर काम करण्याऱ्या टीमची खरी कसोटी आहे. समर्थांनी म्हटल्याप्रमाणे – "राजी राखिता जग, मग कारभाराची लगबग"!

**2.Process (प्रणाली/कार्यपद्धती) :**

प्रकल्प व्यवस्थापनाचे एक विस्तृत शास्त्र आहे. हे शिकता येण्यासारखे कौशल्य आहे – नव्हे त्याची सर्वांनाच गरज पण आहे. दुर्दैवाने याकडे फार कमी लोक किंवा संस्था लक्ष देतात. प्रकल्प व्यवस्थापन प्रणालींमध्ये दोन आघाडीच्या पद्धती म्हणजे Project Management Institute (www.pmi.org) जी अमेरिकन पद्धती आहे किंवा PRINCE2 (https://www.prince2.com/uk), जी ब्रिटिश आहे आणि याचा विस्तार म्हणजे Projects In Controlled Environments. जसे इलाज करणारा डॉक्टर शिकलेलाच असावा लागतो, तसेच महत्वाचे प्रकल्प राबवताना त्याची जबाबदारी येऱ्या-गबाळ्याकडे देऊन कामाचे नाही. या पद्धतीं मध्ये scope (आवाका), cost (खर्च), time (वेळ), quality (उत्तमता), risk (जोखमी), resources (संसाधने), communication (संपर्क), suppliers (कंत्राटदार/सेवा पुरवणारे) अशा १० बाबींचा शास्त्रोक्त पद्धतीने विचार करुन नियोजन कसे करावे याचे प्रशिक्षण दिले जाते.

**3.Environment (परिस्थिती) :**

आधुनिक जग हे वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान, व्यवसाय, शासकीय धोरणे, लोकांच्या अपेक्षा या सर्वच बाबी क्षणा क्षणाला बदलत जातात. प्रकल्पाचे नियोजन सुद्धा त्याच वेगाने या सर्वांना अनुरुप बदलत गेले पाहिजे. याला प्रकल्प व्यवस्थापन परिभाषेत agility असे म्हणतात. आपण त्याला "चपळाई" असं शब्द वापरु. आधुनिक जगात

प्रकल्पाच्या बाबतीत याचा अर्थ काय? थोडक्यात म्हणजे प्रकल्पाचे छोटे-छोटे भाग करुन वेगाने काम पूर्ण करणे – जितक्या लवकर शक्य होईल तितक्या लवकर ते ग्राहक किंवा भाग धारकांसमोर सादर करणे, आणि त्यांचा जो feedback (अभिप्राय) असेल त्या पद्धतीने नियोजनात वेगाने बदल घडवणे. एखादा मुरब्बी खेळाडू जसा परिस्थितीनुसार आपल्या खेळाचा वेग आणि शैली बदलू शकतो, तसेच आहे हे. शक्यतो दर आठवड्याला किंवा जास्तीत जास्त पंधरवड्याला काहीतरी निश्चित काम झाले पाहिजे, त्याचा वेळेत आढावा घेतला पाहिजे, त्यात शक्य तितक्या भागधरकांना सातत्याने सहभागी केले पाहिजे – तरच हे शक्य होईल.हा आठवडा किंवा पंधरवडा या कालावधीला sprint किंवा iteration असे म्हणतात. जितकी छोटी sprint तितकी आपली agility (चपळाई) जास्त. बदलत जाणाऱ्या परिस्थितीचे वेगाने आकलन करण्याचा एक मतीतार्थ असाही गृहीत धरला पाहिजे – की ज्या कारणासाठी प्रकल्पाचा घाट घातला, ते खरंच साध्य होणार आहे का? नसेल तर तो प्रकल्प पद्धतशीरपणे बंद करणेच इष्ट. निदान संस्थेची संसाधने अनावश्यक आणि अनुत्पादक कार्यात वाया जाणे तरी टळू शकेल. हा निर्णय अर्थातच संस्थेचे शीर्ष नेतृत्वच करु शकेल. मात्र त्यासाठी आवश्यक असणारी माहिती आणि विश्लेषण पुरवण्याची जबाबदारी ही प्रकल्प व्यवस्थापक आणि त्याच्या टीम ची आहे.

### स्वयंसेवी संस्थांमधील प्रकल्प व्यवस्थापन :

स्वयंसेवी संस्था समाजा करता उपयुक्त असे अनेक प्रकल्प सातत्याने राबवित असतात. प्रकल्प व्यवस्थापनाचे मूलभूत तंत्र हे जसे एखाद्या व्यावसायिक किंवा शासकीय प्रकल्पाला लागू आहे, तसेच ते स्वयंसेवी प्रकल्पांना सुद्धा आहेच. तरीही स्वयंसेवी संस्थांच्या प्रकल्पांचे काही विशिष्ट पैलू ध्यानी घेतले पाहिजेत.

### निधीची चणचण :

"देणाराचे हात हजारो, दुबळी माझी झोळी" असे गीत सर्वांनी ऐकले असे. मात्र देणगीदार प्रकल्पाला तेव्हाच पैसे देतो, जेव्हा त्याच्यासमोर विस्तृत प्रस्ताव येतो. परंतु तो प्रस्ताव तयार करण्यापूर्वी संस्थेला अनेक सायास पडतात. समाजात जाणे, त्यांच्या समस्या समजून घेणे, त्यावर संशोधनातून आणि चर्चेतून मार्ग शोधणे, इत्यादी. यालाही निधी लागतोच. नियमित संस्था संचालना सुद्धा निधी लागतो. अपुरा निधी असेल तर पूर्वतयारी अपुरी ठरते, आणि प्रकल्प डळमळीत पायावर सुरु होतो. यावर उपाय म्हणजे समविचारी संस्थांनी एकत्र विचार करणे, एकमेकांपासून शिकत राहणे – आणि सर्वात महत्वाचे म्हणजे सर्व खर्चाचा चोख हिशेब ठेवणे. आपण योग्य कारणे देऊन जर संशोधन, संस्था संचालन इत्यादी कार्यासाठी सुद्धा निधी मागितला, तर तो निश्चित मिळू शकेल. पण आपलाच गृहपाठ कच्चा असेल तर मात्र कठीण आहे. स्वयंसेवी संस्थांकरता Fund raising (निधी उपलब्ध करणे) हा एक स्वतंत्र विषयच आहे.

### संसाधानांचा अभाव :

स्वयंसेवी संस्थांकडे प्रकल्पासाठी पूर्ण वेळ कर्मचारी वर्ग, प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र व्यक्ति किंवा विभाग राखणे अवघड आहे. यामुळे अनेकदा एकाच व्यक्ति प्रकल्प, दैनंदिन कामे, हिशेब – या सर्व गोष्टी करीत असतो. त्यात जर तो स्वतः पूर्णवेळ कर्मचारी नसेल तर त्याच्या मागे इतर व्याप असतात. अशा परिस्थितीत प्रकल्पाकडे दुर्लक्ष होऊन त्याचा बट्ट्याबोळ निश्चित समजला पाहिजे. कोणताही प्रकल्प ठरवताना त्याला लागणारे मनुष्यबळ आणि इतर संसाधने उपलब्ध करुन दिलेच पाहिजेत. तशी तरतूद नियोजनात असेलच हवी. इथे सुद्धा गृहपाठ आणि नियोजन पक्के पाहिजे. अन्यथा एकांडा शिलेदार चक्रव्यूहात शाहिद होईल.

### सहाय्यक विभागांचा अभाव :

प्रत्येक संस्थेच्या संचालनासाठी हिशेब (accounts), मानव संसाधन विकास (Human Resourc-es), माहिती तंत्रज्ञान (Information Technology) अशा अनेक विभागातील तज्ञ व्यक्तींची गरज असते. स्वयंसेवी संस्थांकडे असे स्वतंत्र विभाग किंवा व्यक्ति मिळणे अवघड आहे. अशा वेळी विशिष्ट सेवा पुरवणाऱ्या संस्थांचा संपर्क ठेऊन त्यांच्या सेवा मागणी नुसार, तात्पुरत्या स्वरुपात घेणे आवश्यक ठरते.

### आव्हानात्मक परिस्थिती आणि भागधारक :

स्वयंसेवी संस्थांचे प्रकल्प हे सामाजिक समस्येतूनच उद्भवतात, म्हणजे सुरुवातीपासून आव्हाने ठरलेलीच. त्यातून समाज, त्यातील अनेक घटक, त्यांचे आपसातील तणाव, हे सर्व ओघाने आलेच. या सर्वांना कार्याला जोडणे हे मोठे कौशल्याचे काम आहे. व्यापक जनसंपर्क, संवाद आणि संबंध असणे अपरिहार्य आहे.

## यशस्वी प्रकल्पांचे सूत्र :

आव्हाने तर आहेतच, पण प्रकल्प यशस्वी करण्यासाठी काय करता येईल याचाही विचार करु. काही सूत्र पुढे दिलेली आहेत.

### 1.संस्थेच्या नेत्यांनी व्यक्तिगत लक्ष पुरवणे :

स्वयंसेवी संस्थांच्या विश्वस्त किंवा कार्यकारी मंडळात प्रथितयश आणि प्रतिभावान व्यक्तींचा समावेश असतो. अशा नेत्यांनी आपल्या संस्थेच्या कार्यक्रमात, विशेष प्रकल्पात व्यक्तिगत लक्ष दिले पाहिजे. त्यांच्या सहभागामुळे टीम चा हुरुप वाढेल आणि ते अधिक सक्षम होतील.

### 2.कंत्राटी पद्धती आणि कर्मचाऱ्यांचा वापर :

निधीचा ओघ अनिश्चित असल्यामुळे मनुष्यबळाची उणीव असल्यामुळे प्रकल्पाच्या गरजेनुसार संस्थांना कंत्राटदारांचा प्रभावी वापर करायला शिकले पाहिजे. सतत लागणाऱ्या कामासाठी विश्वासू आणि कर्तबगार व्यक्ति आणि कंपन्यांची यादीच असली पाहिजे. यामुळे अल्प अवधीत मोठे काम उभे राहू शकते. कर्मचारी वर्गासाठी सुद्धा अशा पद्धतीने विचार करता येईल. विद्यार्थी दशेत internship करु इच्छिणारे अनेक जण असतात, तसेच समाजाला काही देऊ इच्छिणारे अनुभवी व्यक्ति पण उपलब्ध होऊ शकतात. आपला संपर्क वाढवून, इंटरनेट च वापर करुन अशा व्यक्तींचा शोध घेतला पाहिजे.

### 3.प्रकल्प व्यवस्थापन कौशल्य विकसित करणे :

संस्था कोणत्याही क्षेत्रातील असो, प्रकल्प व्यवस्थापन कौशल्य हे अत्यावश्यक् आहे आणि ते वाढवण्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे प्रशिक्षित मनुष्यबळ संस्थेजवळ नसेल, तर त्यासाठी मार्गदर्शक किंवा consultant शोधायला पाहिजेत. केवळ भाषणे देऊन, आवाहने करुन मोठे प्रकल्प उभे राहू शकत नाहीत.

### 4.दूरगामी आणि सूक्ष्म नियोजनाचा समन्वय साधून "चपळाई" दाखवणे :

कोणत्याही प्रकल्पाचे दूरगामी नियोजन जसे आवश्यक आहे, तसेच त्याची विभागणी करुन निकट भविष्यात (या आठवड्यात, आज) काय करणार आहोत याचेही सूक्ष्म नियोजन सुद्धा आवश्यक आहे. वर म्हटल्याप्रमाणे एक किंवा जास्तीत जास्त २ आठवड्यात प्रत्येक कार्य आणि प्रकल्पाचा आढावा घेतलाच पाहिजे. यात संस्थेच्या नेतृत्वाने सुद्धा रस दाखवला पाहिजे. विनाकारण प्राधान्य क्रम बदलणे, त्याच व्यक्तीला १० कामे सांगणे टाळले पाहिजे. नेत्यांनी शिस्तबद्ध कार्याचा परिपाठ घालून दिला, तर ती संस्था नक्की यशस्वी होईल.

### 5.शाश्वतते कडे लक्ष :

प्रकल्पाच्या सुरुवातीपासूनच त्याच्या लाभाची आणि परिणामांची शाश्वतता कशी टिकेल याचा विचार आणि नियोजन पाहिजे. प्रकल्प संपल्या वर तो कुणाकडे सुपूर्द करणार? त्याच्या देखभालीकडे आणि संचालनाकडे कोण लक्ष देणार? त्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे का? प्रकल्पाचे दृश्य आणि अदृश्य परिणाम मोजण्याची काय यंत्रणा असेल? Third party audit करण्याची गरज आहे का? हे आधीपासून ठरवले तर घडू शकते. अन्यथा प्रकल्प पार पडल्यावर operation successful but patient dead (शस्त्रक्रिया यशस्वी होऊन पण पेशंट मेला) अशी अवस्था होईल.

## सेवावर्धिनी कशी मदत करु शकेल? :

गेल्या २७ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेली "स्वयंसेवी संस्थांची विश्वासार्ह सहकारी" – सेवावर्धिनी या विषयात आपल्या संस्थेला कशी मदत करु शकेल? काही शक्यता पुढे दिल्या आहेत. या व्यतिरिक्त काही कल्पना असतील तर त्यावर निश्चित चर्चा करता येईल.

### 1.प्रकल्प रचना आणि प्रस्ताव लेखन :

समाजाशी नाळ जोडलेली असल्यामुळे स्वयंसेवी संस्था अनेकदा सामाजिक समस्यांविषयी जागरुक आणि संवेदनशील असतात. मात्र यावर उपाय काय करावा, यावर विचारमंथनासाठी मदत लागते. समस्येकडून समाधानाकडे जाण्यासाठी, ठोस आणि प्रभावी प्रकल्प कशा पद्धतीने मांडता येईल यात सेवावर्धिनी निश्चित मदत करु शकेल. अशा प्रकल्पांना निधी मिळवण्यासाठी पण प्रयत्न करता येईल.

### 2.संयुक्त प्रकल्प :

अनेक स्वयंसेवी संस्थांची एकत्र मोट बांधून संयुक्तपणे प्रकल्प राबवणे हा सेवावर्धिनीचा हातखंडा आहे. गेली अनेक वर्षे सुरु असलेला जलदूत प्रकल्प हे याचे उत्तम उदाहरण आहे. यात सेवावर्धिनी शीर्ष संस्था म्हणून program management कडे लक्ष देईल, तर सहभागी संस्था आपापल्या क्षेत्रात प्रकल्प राबवतील. पाणी, शेती, उपजीविका, महिला सबलीकरण, अशा अनेक विषयांवर कार्यरत संस्थांनी एकत्र येऊन जर प्रकल्प आखला तर त्याला निधी मिळणे, योग्य व्यवस्थापन करणे आणि तो यशस्वी करणे निश्चितच सोपे होईल. अशी कोणती कल्पना असेल तरी आपण सेवावर्धिनी शी संपर्क करु शकता.

### 3.प्रकल्प व्यवस्थापन आणि monitoring :

स्वयंसेवी संस्थांकडे जर प्रकल्प व्यवस्थापन, प्रगती अहवाल लिहिणे, प्रकल्पावर देखरेख ठेवणे यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ कदाचित नसू शकेल. या गोष्टी वेळ खाऊ आहेत आणि मूळ कार्यापेक्षा वेगळ्या आहेत. सेवावर्धिनी यात परामर्श, प्रणाली आणि तंत्र बसवून देणे आणि दैनंदिन व्यवस्थापनात सुद्धा सहाय्य करु शकते.

### 4.सामाजिक आणि आर्थिक परिणामांचे विश्लेषण (social and economic impact assessment) :

अनेक देणगीदार सामाजिक आणि आर्थिक परिणामांची मोजणी आणि त्यावर अहवाल लेखन याबाबत विशेष आग्रही असतात आणि ते योग्यही आहे. स्वयंसेवी संस्थांकडे अशा प्रकारचे कौशल्य आणि प्रशिक्षित मनुष्यबळ नसेल किंवा जर देणगीदाराने "third party" अर्थात तटस्थ संस्थेकडून असे मूल्यमापन करुन घेण्याचा आग्रह धरला असेल, तर सेवावर्धिनी यात मदत करु शकते. Project closure report लिहिण्यात सुद्धा सेवावर्धिनी सहाय्य करु शकते.

### 5.प्रकल्प व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे :

अनेक संस्थांकडे प्रकल्प व्यवस्थापन आणि त्यासाठी लागणाऱ्या यंत्रणा (tools and techniques) विकसित नसतात. कमीत कमी खर्चात प्रकल्पाचे documentation, monitoring करणाऱ्या पद्धती कशा विकसित करता येतील आणि माहितीचे योग्य व्यवस्थापन करुन त्याचा दूरगामी वाटचालीकरता वापर करणे यासाठी सुद्धा सेवावर्धिनी मार्गदर्शन करु शकते.

अशा स्वरुपाच्या कोणत्याही सेवे साठी सेवावर्धिनीच्या पुढील ईमेल पत्त्यांवर संपर्क साधावा: contact@sevavardhini.org किंवा projects@sevavardhini.org.

## सारांश:

स्वयंसेवी असो व व्यावसायिक – अनेक संस्थांमध्ये प्रकल्प व्यवस्थापन या विषयाला पुरेसे महत्व दिले जात नाही. यातून मग प्रकल्पातून अपेक्षित असलेले परिणाम साधता येत नाहीत. विशेषतः स्वयंसेवी संस्थांकडे अशा तज्ञतेची नितांत गरज आहे.

प्रकल्प व्यवस्थापन हे एक विशिष्ट कौशल्य आहे. यात शास्त्र आणि कलागुणांचा संगम अभिप्रेत आहे. व्यक्ति, इतर संसाधने यांचा सुयोग्य वापर करुन ध्येयाची पुरती करणे यात प्रकल्प व्यवस्थापनाचे महत्व आहे. आधुनिक युगात बदलत्या परिस्थितीत कार्य करताना प्रकल्प व्यवस्थापनात चपळाई (agility) अत्यावश्यक आहे.

# ४. सकस परसबाग प्रकल्प

## आरोग्य आणि आर्थिक स्वावलंबनाचा उपक्रम

सकस परसबाग प्रकल्प हा सेवावर्धिनीने रिको कंपनीच्या आर्थिक सहकार्याने सहा महिने यशस्वीरित्या राबवला. प्रकल्पाचा उद्देश भूमिहीन, शेतमजूर, ऊसतोड कामगार तसेच आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या कुटुंबांना परसबाग लागवडीद्वारे आरोग्यदायी जीवनशैली आणि आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग दाखवणे हा होता. या उपक्रमांतर्गत 10 प्रकारच्या भाज्यांची बियाणे तयार करण्यात आली, ज्यामध्ये दोडका, कारली, टोमॅटो, दुधी भोपळा, वाटाणा, गवार, मुळा, काकडी आणि पालक यांचा समावेश होता. रिको कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी श्रमदानाद्वारे बियाणे तयार केले, तर सेवावर्धिनीने त्यांचे वितरण प्रभावीपणे पार पाडले.

प्रकल्पाच्या यशस्वितेसाठी सेवावर्धिनीने संस्थांच्या प्रतिनिधींना परसबाग लागवडीचे एक दिवसीय प्रशिक्षण दिले. हे प्रशिक्षण लाभार्थी कुटुंबांपर्यंत पोहोचवण्यासाठी संस्था प्रतिनिधींनी त्यांच्या कार्यक्षेत्रात जाऊन बियाणे वाटप केले. प्रकल्पाच्या योजनेनुसार, दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी आढावा बैठक घेतली जाई. या बैठकीत प्रकल्पात येणाऱ्या अडचणी, कामाची स्थिती आणि सुधारणा यावर चर्चा होई. त्यामुळे इतर प्रतिनिधींनाही मार्गदर्शन मिळाले. आरोग्यदृष्ट्या प्रकल्पाचे योगदान महत्त्वाचे होते. आरोग्य तपासणीसह सेंद्रिय खत वाटप हा प्रकल्पाचा अविभाज्य भाग होता. तसेच, प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात झाडे लावण्यावरही भर देण्यात आला. कडीपत्ता, पपई, शेवगा, आवळा आणि आंबा यांसारख्या झाडांची लागवड करण्यात आली, ज्यामुळे पर्यावरणपूरक वातावरण तयार झाले.

पळसखेल गावात सेवावर्धिनी शेती परिवार व ग्रामपंचायतीच्या सहकार्याने सेंद्रिय परसबाग उपक्रमाने आरोग्य सुधारण्याबरोबरच भाजीपाल्यावर होणाऱ्या खर्चात बचत करण्यास हातभार लावला. गावातील नाना नारायण सावंत आणि सुरेखा सावंत यांनी सेंद्रिय परसबाग फुलवण्याचा आदर्श इतरांसमोर ठेवला. त्यांनी कोणतेही रासायनिक खत किंवा फवारणी न करता परसबाग तयार करण्याचा सल्ला दिला, ज्यामुळे महाभयंकर आजारांपासून कुटुंबांची सुटका होऊ शकते. सकस परसबाग प्रकल्पाने लाभार्थी कुटुंबांना ताज्या व सेंद्रिय अन्नाचा पुरवठा करताना त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचा मार्ग दाखवला. या प्रकल्पामुळे स्थानिक पातळीवर आरोग्य व स्वावलंबनासाठी एक नवा आदर्श निर्माण झाला. "आरोग्यम् धनसंपदा" या तत्त्वावर आधारित हा प्रकल्प इतर क्षेत्रांसाठीही अनुकरणीय ठरला आहे.





# ८. सेवाव्रती

## ८.१ नारायणन कृष्णन : कुशल आचारी ते मानवसेवेचा प्रणेता



नारायणन कृष्णन, मदुराईचा एक कुशल आचारी , जो एका मोठ्या स्वप्नांसह आपली कारकिर्द घडवत होता. ताज हॉटेल्स, बेंगळुरुमध्ये एक प्रतिष्ठित स्वैपाकी म्हणून काम करताना, त्यांनी स्वित्झर्लंडमधील एक नामांकित नोकरीसाठी निवड होण्याचा मान मिळवला. मात्र, २००२ साली घडलेल्या एका हृदयद्रावक प्रसंगाने त्यांच्या आयुष्याला कलाटणी दिली. एका प्रवासादरम्यान, त्यांनी एका वृद्ध व्यक्तीला उपासमारीमुळे स्वतःच्या मलमूत्र खाताना पाहिले. ही दुर्दैवी घटना पाहून नारायणन यांच्या मनाचा ठाव घेतला. त्यांनी त्वरित जवळच्या हॉटेलमधून इडली विकत घेतली आणि त्या वृद्ध व्यक्तीला दिली. त्या व्यक्तीच्या अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी नारायणन यांच्या हृदयात बदल घडवला. त्या घटनेनंतर त्यांनी वैभवशाली कारकिर्दीचा त्याग केला आणि आपल्या जीवनाला मानवतेच्या सेवेसाठी समर्पित केले.

२००३ साली "अक्षया ट्रस्ट" संस्थेची स्थापना करुन नारायणन यांनी मदुराईतील बेघर, गरजू, आणि मानसिक आजारग्रस्त लोकांना अन्न पुरवण्यास सुरुवात केली. ही संस्था दररोज ४२८ लोकांना नाश्ता, जेवण आणि रात्रीचे अन्न पुरवते. मात्र, अन्नदान हीच त्यांच्या सेवाकार्यातील मर्यादा नव्हती. त्यांनी या लोकांच्या केसांचा भांग करणे, दाढी करणे आणि त्यांना स्वच्छता राखण्यास मदत केली, जेणेकरुन त्यांच्या आत्मसन्मानाला पुनरुज्जीवन मिळेल. नारायणन यांनी आपल्या कार्यासाठी कधीही प्रसिद्धीची अपेक्षा केली नाही, पण त्यांच्या उपक्रमांमुळे ते माध्यमांमध्ये सतत चर्चेत राहिले. २०१० साली त्यांना सीएनएन हिरो पुरस्कारासाठी टॉप १० मध्ये स्थान मिळाले, आणि त्यांच्या कार्यावर आधारित "उस्ताद हॉटेल" या मल्याळम चित्रपटात त्यांच्या कार्याची झलक दाखवण्यात आली.

### मानवतेच्या सेवेत जीवनाचा खरा अर्थ

नारायणन यांनी अन्नदानाला केवळ भुकेसाठी दिलासा नव्हे, तर आत्मसन्मान निर्माण करण्याचे साधन मानले. गरजू लोकांना फक्त अन्नपुरवठा करून थांबण्याऐवजी, त्यांनी त्यांचा आत्मसन्मान वाढवण्यासाठी त्यांना स्वच्छतेची सेवा दिली. "खरा आनंद दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू आणण्यात आहे," असे त्यांचे तत्त्वज्ञान आहे. त्यांनी समाजातील दुर्लक्षित घटकांना दिलेल्या सेवेमुळे मानवतेचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

त्यांच्या संस्थेमुळे मदुराईतील हजारो गरजू लोकांना जीवनाचा नवीन अर्थ मिळाला आहे. त्यांनी समाजाला दाखवून दिले की वैयक्तिक स्वार्थ सोडून दिल्यास, आपण मानवतेच्या सेवेसाठी आपले जीवन अधिक अर्थपूर्ण बनवू शकतो. अशा प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वामुळे आजही समाजातील अनेकजण त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आहेत. नारायणन कृष्णन हे एक उदाहरण आहेत की एका व्यक्तीच्या कृतींमुळे किती मोठा बदल घडवता येतो, आणि त्या बदलामुळे समाजाचे भवितव्यही उज्ज्वल होऊ शकते.

### मानवतेचा प्रवास आणि प्रेरणा

नारायणन यांच्या कृत्यांनी सामाजिक सेवा आणि परोपकाराच्या जगाला एक नवीन आयाम दिला आहे. ते कधीही प्रसिद्धीसाठी झगडले नाहीत, परंतु त्यांच्या कार्यानेच त्यांना जागतिक ओळख मिळवून दिली. सीएनएन हिरो पुरस्कार प्राप्त करताना त्यांच्या कार्याने जगभरात दाद मिळवली. "अक्षया ट्रस्ट" मधून त्यांनी अन्नदानाच्या माध्यमातून हजारो गरजू लोकांना आधार दिला. त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही प्रचाराला प्राधान्य दिले नाही, परंतु त्यांच्या सेवाभावी उपक्रमांमुळे समाजावर त्यांचा गहिरा प्रभाव पडला.

नारायणन यांनी दाखवून दिले की, सेवाभाव ही केवळ कृती नसून ती जीवनाची साधना आहे. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन, आपण देखील आपल्या समाजासाठी काहीतरी योगदान देऊ शकतो. असे कार्य करणे म्हणजे केवळ गरजू लोकांना मदत करणे नाही, तर त्यांना आत्मसन्मान आणि स्वाभिमान मिळवून देणे आहे. नारायणन कृष्णन यांचे जीवन म्हणजे मानवतेच्या सेवेसाठी वाहून घेतलेल्या व्यक्तीचे प्रतीक आहे, जे आपल्या कृतींमुळे समाजाला सतत प्रेरणा देत राहते.

# ५.२ डॉक्टर अभिजित सोनावणे



## १५ ऑगस्ट !!!

ही नुसती तारीख नव्हे, आपणा सर्व भारतीयांच्या मनावर सुवर्णाक्षराने कोरलेला हा अभिमानाचा दिवस!

याच तारखेला एकेवर्षी भारत स्वतंत्र झाला होता...आणि एकेवर्षी मी सुद्धा! भारत इंग्रजांच्या गुलामगिरीत होता आणि मी माझ्याच! सुरुवातीला इंटरनॅशनल कंपनीमध्ये मी महाराष्ट्र प्रमुख होतो. महिन्याचं उत्पन्न... 4-5 लाख! पण यांतही समाधानी नव्हतो! भरपूर पैसे कमावणे, वर...वर...वर जाणे...आणखी वरचे पद मिळवणे...! घर गाडी बंगला घेणे... आज महाराष्ट्र प्रमुख आहे, उद्या भारताचा प्रमुख होणे..., जमलंच तर परवा जगातील काही देशांचासुद्धा प्रमुख होणे...! जग जिंकायला निघालेला सिकंदर होतो मी! फरक इतकाच, तो सिकंदर घोड्यावर होता, आणि दिडशहाणा मी... गाढवावर! हे गाढव मीच होतो आणि गाढवावर बसलेला दिडशहाणाही मीच!

एके दिवशी, आयुष्याच्या वाटेत भेटलेल्या भीक मागणाऱ्या एका आजोबांनी या दिड शहाण्या सिकंदराची नशा उतरवली...! माणूस म्हणून जगण्याचे सूत्र सांगितलं...! ॲलोपॅथी, होमिओपॅथी, नॅचरपॅथी आणि इतर कुठल्याही पॅथीपेक्षा Sympathy आणि Empathy (अनुभुती आणि सह अनुभुती) या पॅथी वापरणं हे माणुस असल्याचं लक्षण असतं हे त्यांनी माझ्यावर ठसवलं...! वेद शिकण्यापेक्षा एखाद्याची वेदना समजून घेणं, हे वैद्य असल्याचं खरं लक्षण, हे त्यांनीच मनावर बिंबवलं! डोंगरावर चढणाऱ्या माणसाचे पाय ओढुन त्याला पाडण्यापेक्षा, जमिनीवर पडलेल्या एखाद्या निराधाराचे हात ओढुन त्याला उभं करणं यातच खरा पुरुषार्थ असतो... पुरुषार्थाची व्याख्या नव्यानं त्यांनी मला सांगितली...!

ते खरंतर भिक्षेकरी नव्हते, ते उच्चशिक्षित होते. या गोड व्यक्तीमधुन मधुर रस चावुन चावुन ओरबाडुन घेवुन उसाच्या चोयटीसारखं त्यांच्या भाऊबंदांनी त्यांना रस्त्यात फेकलं होतं! बाबांनी सांगितलेल्या त्या बाबी त्यावेळी कानात आल्या होत्या... पण मनात नाही...! मी धावत होतो शर्यतीत...! शर्यतीची नशा होती...!! पैसे... पद... प्रतिष्ठा... मी एकेक गड जिंकत चाललो होतो... पण मन भरत नव्हतं! हे सगळं कमावून झाल्यावर एके दिवशी भेटायला गेलो त्यांना... आणि समजलं, की मला मुलगा समजणारे "ते" बाबा बेवारस म्हणुन रस्त्यावर "मेले"...! हो... स्वर्गवासी होणं, कैलासवासी होणं आणि देवाघरी जाणं ही प्रतिष्ठितांची मक्तेदारी ...! "मेला" हा शब्द प्रतिष्ठा नसणारांसाठीच ठेवणीत ठेवलाय ! ते मरुन गेले... आणि जातांना भिका-यांच्या डॉक्टरला जन्माला घालुन गेले... ! मी त्यांचा मुलगा म्हणुन जिवंत असुनही ते बेवारस म्हणुन गेले...!

ज्यांनी त्यांना रस काढून हाकलुन दिलं होत, त्यां लोकांत आणि माझ्यात फरक काय? मी अंतर्मुख झालो !पुर्वी दिलेले त्यांचे विचार आता कानातुन मनात यायला लागले... Heart पासुन हृदयात यायला लागले...! त्यांच्या विचारांचं मनन चिंतन व्हायला लागलं, माझ्याही नकळत ....! आणि या दिडशहाण्या सिकंदराची नशा पुर्ण उतरली! जग जिंकण्यापेक्षा, जगातला "माणुस" जिंकावा किंवा माणुसकीचं "जग" जिंकावं...! उतरलेल्या नशेनं हेच शीकवलं! आणि, हा दिडशहाणा सिकंदर त्या गाढवावरुन उतरला आणि 14 ऑगस्टला त्याने या इंटरनॅशनल संस्थेचा राजीनामा दिला. आणि 15 ऑगस्ट 2015 ला भिकाऱ्यांचा डॉक्टर म्हणून तो रस्त्यावर आला...! स्वतःच स्वतःवर लादलेल्या गुलामगिरीतुन तो मुक्त झाला...! मीच आखुन घेतलेल्या पद-पैसा-प्रतिष्ठा या शर्यतीतुन मी स्वतंत्र झालो 15 ऑगस्ट 2015 ला.... म्हणुन हा माझ्या दृष्टीने माझाही स्वातंत्र्य दिन...!

या अगोदर असलेले सर्व दिवस माझ्यासाठी पैसा असुनही "दीन" होते... 15 ऑगस्ट 2015 नंतर ते पैसा नसुनही "दिन" झाले! जवळचे लोक म्हणतात... हरलास तु आभ्या! नाही...! शर्यतीत किती धावायचं? कसं धावायचं? यापेक्षा कुठं थांबायचं...? हे कळणं जास्त महत्वाचं! योग्य ठिकाणी हरावंच लागतं...! कुठं आणि कधी हरायचं हे ज्याला कळतं तो कायम जिंकतो! कारण शर्यतीत धावणाराला हे कधीच कळत नाही... की शर्यत लावणारा स्वतः कधीच पळत नाही! एखाद्याला आपल्या पुढं जाताना बघुनही आपल्याला आनंद झाला तर समजावं... आपण आत्ता खरे "मोठे" झालो...बाकी वय बीय सारं झुठ!! वय फक्त केस पांढरे करण्यापुरतं येतं... जेव्हा ते मन शुभ्र करेल... तेव्हा त्याची किंमत...! नाहीतर नुसताच तो गणितातला एक फालतु आकडा!! दरवेळी मी सर्वांना दर महिन्याचा लेखा-जोखा सादर करत असतो.

15 ऑगस्ट 2015 ला मी इंटरनॅशनल संस्थेमधला जॉब सोडला होता, अंगावरची झूल काढली होती. मी स्वतः मुक्त झालो होतो यादिवशी! आज बरोबर या गोष्टीला सहा वर्षे पूर्ण झाली, म्हणून साधारण सहा वर्षांचा लेखाजोखा आज अगदी थोडक्यात सादर करत आहे... वाटेत भेटलेल्या भीक मागणा-या आजोबांना आदरांजली वहायची म्हणुन भीक मागणा-या समुहासाठी मी काम करायचं ठरवलं. ते तर गेले... पण त्यांच्यासारखे अजुन खुप आहेत... त्यांतल्या एखाद्याला हात देवु, या विचारांतुन...! या समुहासाठी काहीतरी काम करायचं म्हणून रस्त्यावर फिरायला सुरुवात केली. सुरुवातीला मला सुद्धा कशाचीही माहिती नव्हती. मी भीक मागणारांमध्ये मिसळायचा प्रयत्न करु लागलो. सुरुवातीला लाज वाटायची...! डोक्यावर कॅप, डोळ्यावर गॉगल आणि चेहऱ्यावर रुमाल बांधून मी त्यांच्यात मिक्स होण्याचा प्रयत्न करायचो. मुखवटा लावला होता...! पण मला भीक मागणा-या लोकांनी त्यांच्यात सुरुवातीला येवू दिलं नाही.

त्यांना वाटायचं, हा पोलिसांचा खबऱ्या असेल आणि आपल्याला पकडून देईल पोलिसांत, भीक मागतो म्हणुन ... ! (कारण भीक मागणं हा गुन्हा आहे कायद्यानं)किंवा कदाचित आपल्या बरोबर धोका करुन, आपली जमा झालेली भीक घेऊन कुठेतरी पळून जाईल हा भामटा ...! डॉक्टर आहे हा xxx, गोड बोलुन आपल्या किडन्या काढून विकेल, रक्त विकेल, अजुन काही काही पार्ट काढुन हा बाजारात विकेल.... यांत आपण मरुन जाऊ... या डॉक्टरचा भरवसा काय? किंवा आपल्या पोरीबाळींना कुठेतरी फसवेल, फसवुन "धंद्याला" लावेल. (मी अगोदर शरीर विक्रय करणा-या मुलींचं पुनर्वसन करणा-या एका संस्थेत बुधवार पेठेत काम करायचो... शरीर विक्रय करणा-या या ताईंमध्ये माझी उठबस होती, काही लोकांना वाटायचं, हा माझा "धंदा" आहे, आणि मी मधला दलाल! भीक मागणाऱ्या समुहामध्ये हाच गैरसमज पसरला होता)या सर्व गैरसमजापोटी, या लोकांनी मला त्यांच्यात येण्यास पूर्णपणे बंदी घातली, धमक्या दिल्या, शिव्याही दिल्या.

खूप वेळा अंगावर धावुन सुद्धा आले, काही लोक तर चप्पल दाखवायचे किंवा अंगावर थुंकायचे...! मी त्यांच्यात येवुच नये, यासाठी ते हरत-हेनं मला विरोध करायचे! मी पूर्णपणे निराश झालो होतो. या लोकांसाठी मी माझी खुर्ची आणि प्रतिष्ठा पणाला लावली होती. माझ्या चार ते पाच लाखांच्या उत्पन्नावर पाणी सोडलं होतं...मी पूर्णपणे निराश झालो! धोबी का कुत्ता ना घर का ना घाट का अशी अवस्था झाली.कुत्रं तरी बरं, त्याला कुणीतरी हाड् म्हणुन का होईना, तुकडा तरी टाकतं... मला ते ही मिळेना! एकीकडे काहीही कमवत नव्हतो आणि ज्यांच्यासाठी काम करायचं म्हणुन नोकरी सोडली, ते लोक मला भाव देत नव्हते, नव्हे ते मलाच हाकलून लावायचे, जसा काही मीच भिकारी होतो...! या काळात भिक्षेक-यांपेक्षा वाईट अवस्था झाली माझी! मी खरोखरचा बेरोजगार, बेनाम झालो होतो... 14 ऑगस्ट पुर्वी लोक अपॉइंटमेंट घेवुन आदरानं भेटायला यायचे... 15 ऑगस्ट नंतर भिक्षेकरी पण मला हाकलुन द्यायचे...

माझ्यावर थुंकायचे! किती विरोधाभास! लाखोंचा पगार थांबल्यामुळे, माझं घर डबघाईला आलं... कालचा साहेब, आज भिकारी झाला! एका रात्रीत रावाचा रंक होतो... आणि रंकाचा रावही होवु शकतो... ही म्हण मला माहीत होती...! मी रावाचा रंक झालो होतो, त्या काळात, एका भिका-यांचं उत्पन्न माझ्यापेक्षा जास्त होतं ...! अशा परिस्थितीत, डॉक्टर मनीषा धावुन आली. अर्धांगिनी असण्याचं कर्तव्य तीनं निभावलं! तिने आर्थिक स्थिती सावरण्याचा प्रयत्न केला... आई-वडील डॉक्टर पीडी सोनवणे आणि सौ भारती सोनवणे यांनी मानसिक आधार दिला. माझा भाऊ अमित सोनवणे आणि बहीण दिप्ती सोनवणे यांनी चोहोबाजुंनी आधार दिला...!पण तरीही मी पुर्ण ढासळलो होतो...! आर्थिक आणि मानसिक! यांतुनही मी रस्त्यांवर फिरायचो भिक्षेक-यांत.... आणि मला ओळखणारे लोक मात्र माझी खिल्ली उडवायचे... काय हो, महाराष्ट्र प्रमुख, आज रस्त्यावर कसे काय तुम्ही...? खी.खी.. खी... हसत लोक टोमणा मारायचे...! एसी हाफीसात बसणारे तुमी... आज गटाराजवळ बसले, वास घेत गटाराचा ... आरारारा.... वाईट वाटतं बुवा तुमचं... खी..खी... खी...! काय वो सर... आज भिका-यांत बसले तुम्ही...? काय पाळी आली राव तुमच्यावर... खी..खी... खी...! कशाचा सर रे तो ...? खी..खी... खी...हि, खी... खी... खी... मी आयुष्यात कधीही विसरु शकत नाही !!!

मात्र या खी... खी... खी...ने इरादे अजुन मजबुत केले! मित्र म्हणायचे, काय बे, आब्या उतरली का रे मस्ती तुजी? साल्या, लोकांना नोकऱ्या मिळत नाहीत, तु मोटा तीस मार खान निघालास होय ? स्वतःला शाना समजतो का रे? एवढी मोठी नोकरी सोडलीस? मर साल्या आता, नोकरी सोडून जो शहाणपणा केला आहेस भोग त्याची फळं... त्याच लायकीचा आहेस xxxx तु... ! ही xxxx शिवी मनात रुतुन बसलीय, काट्यासारखी ... !हि शिवी मी मनात जपुन ठेवलीय... फ्रेम करुन आणि या फ्रेमवर मी खुप प्रेम करतो ! मी पुर्ण डिप्रेस झालो होतो, डिप्रेस करणारे माझेच होते...! बुडण्याचं दुःखं नसतं... मरण्याचंही नसतं, पोहता येत नाही याचंही दुःखं मुळीच नसतं... पाण्यात ढकलणारा जेव्हा आपलाच असतो ते खरं दुःखं! मी या दुःखात बुडुन गेलो! तरीही निर्लज्जासारखं, मला हाकलून देणाऱ्या भिक्षेक-यांमध्ये मी रोज रोज जायचो. नाही नाही ते त्यांचं ऐकून घ्यायचो, त्यांच्या पोटभर शिव्या खायचो, रात्री झोप लागायची नाही, कारण शिव्याशाप खावुनही शेवटी पोट रिकामंच असायचं....! हे असं एक नाही, दोन नाही, तीन नाही, तर तब्बल 31 महिने चाललं...! एकेदिवशी, अंगावर अक्षरशः किडे पडलेले, फुटपाथवर 24 वर्षे पडलेले एक आजोबा होते, त्यांच्या पाच फुटांवर सुद्धा कुणीही जात नसे.

त्यांचं सर्व ड्रेसिंग करुन, त्यांना स्वच्छ करुन "आपलं घर" च्या विजय फळणीकर सरांकडे एका वृद्धाश्रमात ठेवलं. या बाबांना पूर्ण माणसात आणलं....! ते गेले, तेव्हा त्यांचा मुलगा म्हणुन त्यांचे अंत्यसंस्कारही केले....! भीक मागणाऱ्या समूहाने हे सर्व पाहिलं... ! यानंतरही या भिक्षेकर्यांनी मी भिक्षेक-यांसाठी केलेल्या अनंत गोष्टी दुरुन दुरुन पाहिल्या...! आणि हळूहळू माझ्याबद्दलचं त्यांचं मत बदलत गेलं...! यार ... हे सालं आपल्यातलंच हाय... ह्यो आपल्यासाटीच कायतरी करतोय ...! इतकी साधी गोष्ट त्यांना कळायला 31 महिने गेले होते... आणि हे त्यांना कळेपर्यंत मी पण ख-या अर्थानं भिकारी झालो होतो...! हळूहळू मला त्यांनी आपल्या मध्ये ऊठ-बस करण्याची मनापासुन परवानगी दिली. ऑगस्ट 2015 ते मार्च 2018 अशी अडीच वर्षे मी फक्त त्यांच्यात मिक्स होण्यासाठी झुंजत होतो...! हा काळ माझ्यासाठी अत्यंत वाईट होता... खडतर होता...! त्यांच्याशी नातं निर्माण करण्यासाठी आणि विश्वास निर्माण करण्यासाठी मला अडीच वर्षे झुंज द्यावी लागली. या काळात त्यांच्याशी नातं निर्माण करण्यासाठी मी त्यांच्याबरोबर सतत बसत असे, उठत असे, जेवत असे, खात असे...!

भिक्षेक-यांनी माझी अशी अडीच वर्षे कठोर परीक्षा पाहून मला त्यांच्यातला एक होण्याची संधी दिली...! भिकारी होणंही इतकं सोपं नसतं तर ! त्यासाठी पण परिक्षा असतात... MPSC आणि UPSC पेक्षा अवघड! यासाठीही कठोर परिश्रम असतात तर !!! साधारण एप्रिल 2018 पासून माझं डॉक्टर फॉर बेगर्स म्हणून खऱ्या अर्थाने काम सुरु झालं. डॉक्टर होण्यासाठी, कलेक्टर होण्यासाठी किंवा एखादा ऑफिसर होण्यासाठी आधी तीन ते चार - पाच वर्षे कठोर अभ्यास करावा लागतो आणि त्यानंतरच पदवी हातात मिळते. मी सुद्धा अडीच तीन वर्षे कठोर परिश्रम घेऊन भिकाऱ्यांचा डॉक्टर ही पदवी मिळवली होती, उत्तम मार्कांनी मी पास झालो होतो ! होय... मी भिका-यांचा डॉक्टर झालो होतो... ! ही पदवी मात्र एकदा हातात पडल्यानंतर, मी मागं वळून पाहिलंच नाही. सांगायला अभिमान वाटतो की, आज या भिक्षेकरी कुटुंबाचा मी कुटुंबप्रमुख आहे. मला विचारल्याशिवाय आज कोणतीही गोष्ट आज यांच्यात होत नाही...यांच्यामध्ये सोयरीक जुळताना सुद्धा आज माझा शब्द शेवटचा धरला जातो.यांच्या पोरांची नावं मला विचारुन ठेवली जातात...!पोरी कुठलीही गोष्ट पहिल्यांदा आपल्या आईला सांगतात...पण, आज भिक्षेकरी पोरी मला नी मनिषाला त्यांच्या आईअगोदर आम्हाला सारं सांगतात...!

आमी आईबाप होवुन गेलो अशा पोरींचे... बिन बाळंतपणाची, मनिषा... आई झाली त्यांची! लगीन झालेली बाई, सर्व गोष्टीं आपल्या नव-याला, नायतर आपल्या बापाला सांगते... पोरी मलाच बाप समजाया लागल्या.... आयशप्पत... मी पन्नास वर्षाच्या विवाहित पोरीचा पण बाप झालो...! बापापेक्षा पोरगी वयानं मोठी... पण म्हटलं ना? वय हा फक्त एक आकडा! नातं महत्वाचं... आणि नात्याला वय नसतं !भिक्षेक-यांच्या शंभराहुन अधिक पोरांची नावं आज "अभिजीत" आहेत...पन्नासाहुन अधिक पोरींची नाव आज "मनिषा" आहेत...! कोणताही पुरस्कार फिका वाटतो मला यापुढं! आज सहा वर्षांनंतर माझं भिक्षेक-यांचं कुटुंब 1100 इतक्या लोकांचं आहे. यात मला 200 ते 300 इतके आईबाप आहेत, तितकेच आजी-आजोबा आहेत आणि या वयामध्ये मला आणि मनिषाला 200 ते 300 पोरं सुद्धा आहेत ! आज जगातला सर्वात श्रीमंत व्यक्ती मी असेन असं मला वाटतं! या सर्वांशी मानसिक नाती जुळवता जुळवता 1100 भिक्षेक-यांना वैद्यकीय सुविधा देत आहोत. यांच्या, म्हणजेच आमच्या 52 पोराबाळांचे शिक्षण करत आहोत, याहुन आनंद कोणता?

डोळ्यांना दिसत नसल्यामुळे या भिक्षेकरी आजीआजोबांचे रस्त्यांत अपघात होतात, यात त्यांचे जीव जातात, हातपाय मोडतात.... ते टाळावे म्हणून अशा 950 लोकांचे डोळ्यांचे ऑपरेशन आपण करुन दिले आहेत आणि आता अपघाताचे प्रमाण सुद्धा कमी झाले आहे. रस्त्यावर बेवारस म्हणून कित्येक वर्षे खितपत पडलेल्या 22 आजी आणि आजोबांना महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या वृद्धाश्रमांमध्ये निवारा मिळवून दिला आहे. ते तिथे माझे आई बाप - आजी आजोबा म्हणूनच राहतात. स्वतःचं नाव आणि आडनाव सुद्धा ते विसरुन गेले आहेत... आता ते आडनाव सुद्धा "सोनवणे" म्हणुन लावतात! सोनवणे आडनावाला याआधी इतका सन्मान कधी मिळाला नव्हता...! पण, आईबापाला आधार दिला म्हणुन स्वतःला सुदैवी समजु की आईबापाला वृद्धाश्रमात ठेवावं लागतंय म्हणुन स्वतःला दुर्दैवी समजु..? या विचारांत आजही झोप लागत नाही मला! हा भीक मागणारा समुह जर कष्टकरी झाला तरच समाज त्याला गावकरी म्हणून स्वीकारेल याची मला जाणिव झाली. भीक मागणारांना गावकरी बनवायचं हे ध्येय ठरवुन" भिक्षेकरी ते कष्टकरी आणि कष्टकरी ते गावकरी" हि आमच्या कामाची टॅगलाईन मी ठरवली!

माझ्या शब्दांना भिक्षेकरी गटामध्ये थोडी किंमत आहे हे कळल्यानंतर मी त्यांना भीक मागणं सोडायला प्रवृत्त केलं, आणि त्यांना त्यांच्या कुवतीप्रमाणे वेगवेगळे व्यवसाय सुचवण्यात सुरुवात केली. याला यश येऊन 105 कुटुंबांनी भीक मागणं सोडलं आहे आणि हि कुटुंबं आज सन्मानाने जगत आहेत. रस्त्यावर चालणाऱ्या या कामांमध्ये मला अनेक व्यक्ती आणि संस्था यांची मदत झाली. पब्लिक चॅरिटी कमिशन ऑफिस, इन्कम टॅक्स ऑफिस, महिला व बालकल्याण, दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, लेले हॉस्पिटल, पोलीस डिपार्टमेंट, पुण्यातील नामांकीत संस्था आणि व्यक्ती! संस्थेतील बड्या अधिका-यांची नुसती भेट घेणं, "मुश्कील ही नही नामुमकीन है"... तरीही ही मंडळी मला लहान पोरगं समजुन मला वेळ देतात... माझं ऐकुन घेतात... मदत करतात. मोठ्ठ्या खुर्चीतली ही सर्व माणसं माझ्यासाठी मुद्दामहुन छोटी होतात! लहान बाळाबरोबर खेळतांना आपणही लहान होतो तसंच...!!! कसे ऋण फेडावे यांचे? याच प्रवासात आपल्यासारखे सहृद भेटले आणि आपण माझ्यावर पूर्णपणे विश्वास टाकून संस्थेला देणगी देण्यासाठी सुरुवात केली.

मी सुद्धा या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी करत असलेल्या कामाचा सर्व लेखा-जोखा दर महिन्याला सर्व सहृदांना पाठवत असतो. मी करत असलेल्या कामाबद्दल सर्व बाबी प्रांजळपणे कळवतो आणि सल्ला सुद्धा घेतो. यातून कामांमध्ये एक पारदर्शीपणा राहण्यासाठी खूप मदत झाली, शिवाय हे काम फक्त डॉक्टरच नाही तर आपलंही आहे हे समाजाला वाटायला लागलं! न फेडता येणा-या आपल्या ऋणांत आहे मी, माझा साष्टांग नमस्कार स्विकारावा! हे सर्व करत असताना मी भीक मागणा-या व्यक्तींच्या हृदयापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करु लागलो. त्यांची सुखदुःख समजून घेण्याचा प्रयत्न करु लागलो. आणि यातूनच जन्म झाला माझ्या ब्लॉगचा...! भारतात आणि भारताबाहेर हे ब्लॉग पोहोचू लागले. शाबासकी मिळू लागली आणि या अशा शाबासकी ने माझा हुरुप आणखी वाढला. काही लोक माझे ब्लॉग स्वतःचे म्हणून त्यांच्या नावावर कॉपी करुन पुढे पाठवतात. या गोष्टीचा मला मुळीच खेद नाही.... पण खेद याचा वाटतो की ते फक्त माझे ब्लॉग कॉपी करतात माझं काम नाही...! ब्लॉग कॉपी करण्याबरोबरच माझं काम जेव्हा ते कॉपी करतील तो दिवस माझ्या आनंदाचा! जवळचे लोक मला नेहमी विचारतात आभ्या, इतकं सगळं करुन तू काय कमावलंस..? मी खूप काही कमावलंय... आदरणीय सिंधुताई सपकाळ उर्फ माई यांनी मला मुलगा म्हणून मला स्वीकारलं, हे पुत्रत्व मी कमावलं! आदरणीय राणीताई बंग यांचा हात डोक्यावर मायेने पडला, तो मायेचा हात मी कमावला...!

आदरणीय डॉक्टर प्रकाश आमटे यांनी हूरुप देऊन सामर्थ्य दिले, हात धरुन शक्ती दिली, ती शक्ती मी कमावली...! शास्त्रज्ञ आदरणीय रघुनाथ माशेलकर यांनी पोटाशी धरुन उच्चारलेले I am proud of you my child हे शब्द, या शब्दांतुन child असणं मी कमावलं ! सुपर कॉम्प्युटर चे जनक श्री विजय भटकर म्हणाले होते, 'मी कॉम्प्युटर बनवला, पण तू माणूस घडवतो आहेस... ' मी हा "विजय" कमावला...!विश्वास नांगरे पाटील सर म्हणाले होते, भारीच करतोय तु राव कायतरी, आयुष्यात कधी अडचण आली तर मला फोन कर... हा घे माझा पर्सनल नंबर... हा "विश्वास" मी कमावला... !तुमच्यासारखे जवळचे लोक मी कमावले... ! जन्माला येताना माकड म्हणूनच जन्माला आलो... परंतु भीक मागणाऱ्या लोकांमध्ये राहून मी हळूहळू माणूस बनत गेलो... माणुस म्हणुन चेहरा मी कमावला... ! ते खरं रे आभ्या परंतु या बदल्यात तु गमावलंस किती... ? अरे हो, खरंच मी खूप काही गमावलं सुद्धा आहे... ह्या कामानं मी... मी पणा गमावला !

आपण कुणीतरी आहोत याचा अहंकार मी गमावला! केवळ स्वतःपुरतं जगायचं हा स्वार्थ मी याच कामा मध्ये गमावला! स्वतःच्या चेहऱ्यावर लावलेला खोटा खोटा मुखवटा मी गमावला! सर आणि साहेब यांची खोटी प्रतिष्ठा गमावली... ! पोरा - लेकरा - बाळा या उबदार शब्दात मी विसावलोय आता... मला खुर्चीपेक्षा... उकीरडा आवडायला लागलाय आता! मला उष्टं... खरकटं... शिळं ... आणि नासकं जेवण आवडतं हल्ली आणि आवडत राहील, तोपर्यंत.... जोपर्यंत माज्या भिकारी आईबापाला सन्मान मिळत नाही तोपर्यंत! माझा भिक्षेकरी जोपर्यत कष्टकरी होत नाही तोपर्यंत... तो गांवकरी होणार नाही तोपर्यंत..! माझ्या आईबापाला जेव्हा मी भिक्षेकरी म्हणुन स्वतंत्र करेन तोच माझा स्वातंत्र्य दिन असेल...! मी तर सारा लेखाजोखा मांडलाय... आता अजुन कमवायचं राहिलं काय...? आणि गमवायचं राहिलं काय...? माय बापहो... तुम्हीच निवाडा करा...!

**जयहिंद !!!**


**डॉ. अभिजीत सोनवणे**
**डॉक्टर फॉर बेगर्स**
**सोहम ट्रस्ट, पुणे**
**9822267357**
**abhisoham17@gmail.com**
**www.sohamtrust.com**
**Facebook : SOHAM TRUST**

# ६. स्वयंसेवी संस्थांचे आर्थिक व्यवस्थापन आणि निधी संकलनाचे महत्त्व

स्वयंसेवी संस्थांच्या आर्थिक व्यवस्थापनामध्ये निधी संकलन, निधीचा विनियोग, हिशोब लेखन, लेखा परीक्षण, गुंतवणूक धोरण, विविध कायदेशीर तरतुदी हे महत्त्वाचे विभाग येतात. निधी संकलन हा महत्त्वाच्या विभागाचा  काटेकोरपणे विचार होत नाही व संस्था आर्थिक दृष्ट्या अडचणीत येऊ शकते. निधिसंकलनाचा विचार आर्थिक वर्ष सुरु होण्यापूर्वीच करायला हवा. याच साठी पुढील वर्षाचे अंदाजपत्रक (बजेट) फेब्रुवारी महिना अखेरीस धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे दाखल करणे अपेक्षित व अनिवार्य असते. बऱ्याच संस्था अंदाजपत्रक धर्मादाय आयुक्तालयात सादर करताना आढळत नाहीत.

अंदाजपत्रकात पुढील वर्षातील नियोजित कामे व त्याचा अपेक्षित खर्च याचा विचार करावा लागतो. यातून वर्षासाठी किती निधी लागणार आहे आणि कशासाठी लागणार आहे  याचा पूर्ण तपशील लक्षात येतो. उदाहरणार्थ दैनंदिन व्यवहार खर्च, प्रकल्पासाठी लागणारा खर्च (मनुष्यबळ व इतर), पायाभूत सुविधांसाठी (Infrastructure Facilities) येणारा खर्च, नवीन मालमत्ता (Assets) वाहन, फर्निचर, संगणक, पुस्तक, साठी लागणारा निधी या सर्व गोष्टी विचारात घेऊन बजेट तयार करणे आवश्यक असते.

सेवा तरंग 2.0

# संपादक मंडळ

श्री. सोमदत्त पटवर्धन - कार्यवाह

श्री. विक्रम पंडित - कार्यकारिणी सदस्य

सौ. गिरीजा सिरशीकर - प्रकल्प व्यवस्थापक

श्री. आमोद काटीकर - प्रकल्प अधिकारी

# विशेष सहाय्य

श्री. प्रमोद कुलकर्णी

श्री. आशिष कुवळेकर

श्री. विनायक करमरकर

श्री. संदीप शौचे

सेवावर्धिनी

एक विश्वासार्ह सहकारी